रायगड, रविवार, दि. १७ मे २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

# टोल पूर्ण, रस्ता अपूर्ण

## कोकणवासियांची थट्टा; शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा घणाघात

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

गेली १७ वर्षे मुंबई-गोवा महामार्गाचे रखडलेले काम, रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे, धुळीचे ढग, वाहतूक कोंडी आणि अपघातांचे वाढते प्रमाण असताना सरकार बिनदिक्कतपणे टोलवसुली सुरु करतेय, हे अत्यंत चुकीचे आहे. या प्रकारामुळे कोकणवासियांमध्ये संतापाची लाट उसळली असून, शेतकरी कामगार पक्ष या निर्णयाचा जाहीर निषेध करीत असल्याचे मत शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केले. या महामार्गाची खरं तर गिनिज बुकमध्ये नोंद झाली पाहिजे, असा टोलाही त्यांनी सरकार आणि प्रशासनाला लगावला.

रस्ताच पूर्ण नाही, मग टोल कसला घेताय? जनतेला सुविधा नाहीत, सुरक्षा नाही, वेळेची बचत नाही, मग हा टोल नेमका कशासाठी? असा थेट सवाल करत चित्रलेखा पाटील यांनी सरकारच्या कारभारावर ताशेरे ओढले.

महामार्गाच्या चौपदरीकरणाचे गाजर दाखवत कोकणवासियांना वर्षानुवर्षे वेठीस धरण्यात आले. प्रत्यक्षात अनेक ठिकाणी काम संथ गतीने सुरू आहे. काही भागात तर रस्ते उखडून ठेवले असून, नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. दररोज अपघात होत आहेत, वाहनांचे नुकसान होत आहे, रुग्णवाहिका वेळेत पोहोचत नाहीत, व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे; मात्र सरकार आणि ठेकेदार यांच्याकडून केवळ आश्वासनांची खैरात सुरू आहे. कोकणातील जनता पान २ वर



### फक्त घोषणा अन् वाढीव बजेट

प्रत्येक वर्षी नवीन मुदत, नवीन घोषणा आणि वाढीव बजेट करण्याचे काम ठेकेदाराने केले आहे. १७ वर्षांत या महामार्गाचे काम पूर्ण करण्यात सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. काम पूर्ण करण्यापेक्षा खर्च वाढवण्याचीच स्पर्धा सुरू आहे. ठेकेदार आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचा फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. अपूर्ण रस्त्यावर टोलवसुली म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे, असा संतप्त आरोपही चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित केला.

# जंजिऱ्याचे दरवाजे बंद

## संतप्त शिडाच्या बोटधारकांचा संप

। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।

ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांना सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी तब्बल १११ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या नव्या प्रवासी जेट्टीचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. या जेट्टीमुळे यांत्रिकी बोटींद्वारे पर्यटकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर झाला असला, तरी जेट्टी किल्ल्याच्या मागील बाजूस असल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार बंद करण्यात आल्यानंतर राजपुरी येथील पारंपरिक शिडाच्या बोटधारकांनी संतप्त होत बोटसेवा बंद ठेवत संप पुकारला.

सकाळपासूनच राजपुरी बंदरावर शिडाच्या बोटी थांबवण्यात आल्याने पर्यटकांची मोठी गैरसोय झाली. अनेक पर्यटक किल्ल्यावर जाण्यासाठी पान २ वर



> समुद्राच्या परिस्थितीत शिडाच्या बोटीने मागील बाजूस जाणे धोकादायक आहे. पर्यटकांची सुरक्षा महत्त्वाची असल्याने सर्व संबंधित विभागांशी चर्चा करून तोडगा काढला जाईल. – एम. पवार, अधिकारी, मेरीटाईम बोर्ड







# राष्ट्रवादीत तटकरे, पटेलांना स्थान नाही?

## सुनेत्रा पवारांच्या नव्या पदाधिकारी यादीमुळे खळबळ

। मुंबई । प्रतिनिधी ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नव्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या यादीवरून पक्षात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना महत्त्वाच्या पदांपासून दूर ठेवण्यात आल्याची चर्चा रंगली असून, सुनेत्रा पवार यांनी पक्षात स्वतःचे वर्चस्व अधिक मजबूत केल्याचे बोलले जात आहे.

नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीत पार्थ पवार यांची राष्ट्रीय सरचिटणीस, तर जय पवार यांची राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, अनेक वर्षांपासून पक्षासाठी काम करणारे प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि दिलीप वळसे-पाटील यांसारख्या दिग्गज नेत्यांना महत्त्वाच्या पदांपासून पान २ वर

**WE ARE HIRING – KONKAN ESTATE**

Project: MangoFolks (Premium Farm Project)

Site Supervisor (3 Positions)Salary: ₹40,000/month
Multipurpose Worker (3 Positions), Salary: ₹25,000/month
Surveyor (1 Position), Salary: ₹30,000/month
Security Guard (4 Positions), Salary: ₹20,000/month
Agronomist (1 Position), Salary: ₹1,00,000/month
Experience: 8–10 Years

Contact: 9325437216 (Send your CV on WhatsApp(|)
Location: Konkan Region (MangoFolks Project Site)

Konkan Estate – Delivering Excellence in Land & Farm Development
MangoFolks – A Premium Community Farming Project



# टोलवसुलीवरुन संतापाची लाट

## खारपाडा टोलनाक्यावर वाहनचालक आक्रमक; आधी काम पूर्ण करण्याची मागणी



। माणगाव । प्रतिनिधी ।

बहुचर्चित मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण आणि काँक्रीटीकरणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना रायगड जिल्ह्यातील खारपाडा टोलनाक्यावर १५ मेपासून टोलवसुली सुरू करण्यात आल्याने वाहनचालक, कोकणवासीय, स्थानिक ग्रामस्थ तसेच विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. अपूर्ण महामार्गावर टोल आकारणी सुरू केल्याच्या निषेधार्थ आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

महामार्गाच्या अनेक भागांमध्ये अजूनही कामे रखडलेली असून ठिकठिकाणी खड्डे, धुळीचे साम्राज्य, अपुरे सेवा रस्ते, अर्धवट उड्डाणपूल आणि सुरक्षाव्यवस्थेचा अभाव यामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अशा परिस्थितीत टोल आकारणी सुरू झाल्याने ''अपूर्ण रस्त्यावर टोल कशासाठी?'' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गेल्या १७ वर्षांपासून रखडलेल्या या महामार्गामुळे शेकडो अपघात झाले असून, अनेकांना जीव गमवावा लागला आहे. हजारो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असताना प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा टोलवसुलीला प्राधान्य दिल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. ''महामार्ग पूर्ण होईपर्यंत टोल देणार नाही,'' अशी ठाम भूमिका अनेक संघटनांनी घेतली आहे.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने खारपाडा टोलनाका कार्यान्वित केला असून, सुकेळी खिंडीजवळील दुसरा टोलनाकाही तयार आहे. तेथूनही लवकरच टोलवसुली सुरू होण्याची शक्यता आहे. मात्र नागोठणे, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणेरे तसेच रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील अनेक भागांमध्ये महामार्गाची कामे अजूनही संथ गतीने सुरू असल्याचे वास्तव आहे. अनेक ठिकाणी वाहतूक अरुंद वळणमार्गांवरून सुरू असून, सेवा रस्त्यांच्या अभावामुळे स्थानिक ग्रामस्थांचा प्रवास धोकादायक बनला आहे. पावसाळा तोंडावर असताना महामार्गावरील चिखल, खड्डे आणि वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना तासन्तास अडकून पडावे लागत आहे. अपघातांची वाढती संख्या चिंतेचा विषय बनली आहे. अशा वेळी टोलवसुली सुरू केल्याने प्रवाशांमध्ये नाराजी अधिक तीव्र झाली आहे. पर्यटन हंगामाच्या पार्श्वभूमीवर या निर्णयामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांवर आर्थिक भार वाढणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, महामार्ग पूर्णपणे सुरक्षित, खड्डेमुक्त आणि वाहतुकीसाठी सक्षम झाल्यानंतरच टोल आकारणी सुरू व्हायला हवी होती. अनेक पुलांचे जोडरस्ते अपूर्ण आहेत, माणगाव आणि इंदापूर बायपासचे काम रखडले आहे, सेवा रस्त्यांच्या अभावामुळे स्थानिक वाहतूक जीवघेणी बनली आहे.

### फास्टॅग नसल्यास दुप्पट टोल

एनएचएआयने फास्टॅग नसलेल्या वाहनांकडून दुप्पट टोल आकारला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. २४ तासांच्या आत परतीचा प्रवास केल्यास सवलतीचा दर लागू राहणार आहे. स्थानिक रहिवाशांसाठी मासिक पासची सुविधा देण्यात आली असली तरी रायगड जिल्ह्यातील एमएच-०६ नोंदणी असलेल्या वाहनांना संपूर्ण टोलमाफी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### असे आहेत टोलदर

कार/जीप/व्हॅन एकेरी ₹७५। परतीचा ₹११५
हलकी व्यावसायिक वाहने/ मिनी बस ₹१५५ । ₹२३५
बस / ट्रक ₹३२५ । ₹४९०
तीन ॲक्सल व्यावसायिक वाहने ₹३५५ । ₹५३५
जड बांधकाम यंत्रसामग्री ₹५१० । ₹७६५
सात किंवा अधिक ॲक्सल वाहने ₹६१० । ₹९१५

### आंदोलनाचा इशारा

टोलवसुलीच्या विरोधात विविध सामाजिक संघटना, वाहन संघटना आणि स्थानिक नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ''रस्ता पूर्ण करा, मग टोल घ्या'' अशी मागणी करत लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. कोकणवासियांमध्ये वाढत चाललेल्या असंतोषामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.



# मान्सून अंदमानमध्ये दाखल

। मुंबई । प्रतिनिधी ।

भीषण उकाड्याने आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सूनने भारतात अधिकृतरित्या पाऊल ठेवले असून, तो अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल झाला आहे. मान्सूनने अंदमान समुद्रासह बंगालच्या उपसागराचा काही भाग व्यापला असून, श्रीविजयपूरमसह अंदमान बेटांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या अंदमान परिसरात ताशी ३५ ते ४५ किलोमीटर वेगाने पश्चिमेकडील वारे सक्रिय झाले आहेत. पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक वातावरण निर्माण झाले आहे. आग्नेय अरबी समुद्र आणि पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात मान्सूनची प्रगती वेगाने अपेक्षित आहे.

### हवामान विभागाची महत्त्वपूर्ण माहिती

यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर भीषण अपघात



। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील बोरघाट परिसरात शनिवारी सायंकाळी भीषण अपघात होऊन दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. खोपोली बायपासजवळ ढेकू गावाच्या हद्दीत दोन ट्रक आणि एका कंटेनरमध्ये झालेल्या या अपघातामुळे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक सुमारे तासभर विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील किलोमीटर ३८ परिसरात तीव्र उतारावर एका ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने हा भीषण अपघात घडला. रंगाचे डबे घेऊन जाणाऱ्या ट्रकने समोरील वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात एकूण तीन जड वाहने एकमेकांवर आदळली. अपघातग्रस्त ट्रक क्रमांक केए-५६-२१९९ मधील चालक आणि क्लिनर यांचा जागीच मृत्यू झाला. दुसरा ट्रक क्रमांक आरजे-१९-जीजी-४१७५ मधील चालक गंभीर जखमी झाला असून, कंटेनर क्रमांक एमएच-०४-जीआर-२८७४ मधील चालकालाही दुखापत झाली आहे. जखमींना तातडीने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृत आणि जखमींची ओळख उशिरापर्यंत पटू शकली नव्हती. अपघातामुळे ट्रकमधील रंगाचे डबे आणि इतर साहित्य रस्त्यावर

### दोन ठार, दोन जखमी

विखुरल्याने महामार्गावरील केवळ एकच लेन सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली.

घटनेची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, खोपोली पोलीस, आयआरबी यंत्रणा तसेच हेल्प फाउंडेशनची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. बचाव पथकाने ट्रक आणि कंटेनरमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलवले. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करुन वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली.

# पाणीप्रश्नावर महाविकास आघाडीचे आंदोलन स्थगित

- मंत्री गणेश नाईक यांच्या बैठकीनंतर निर्णय
- मुख्यमंत्र्यांसोबत लवकरच बैठक होणार

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पालिका हद्दीतील वाढत्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर महाविकास आघाडीच्या वतीने १७ मे रोजी कामोठे येथे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र, मंत्रालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर हे आंदोलन पुढे ढकलण्यात आल्याची माहिती महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी दिली.

१५ मे रोजी पनवेल महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका आणि सिडकोच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांसोबत महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली होती. त्यानंतर मंत्रालयात वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत तिन्ही प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली.

या बैठकीत पनवेल शहरातील पाणीटंचाई, अपुरा पाणीपुरवठा आणि भविष्यातील उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पाणी प्रश्नाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री गणेश नाईक यांनी दिले. या आश्वासनानंतर महाविकास आघाडीने १७ मे रोजी होणारे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

पान १ वरून

## जंजिऱ्याचे दरवाजे बंद

ताटकळत उभे राहिले. अखेर पोलिसांनी पर्यटकांना खोरा बंदरातून यांत्रिकी बोटीने किल्ल्याकडे जाण्याचा सल्ला दिला.

दरम्यान, नव्या जेट्टीवर उतरल्यावर पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पायी बराच पल्ला गाठावा लागत आहे. त्यामुळे किल्ला पाहण्यासाठी अधिक वेळ मिळावा, अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे. मात्र, बोटधारकांकडून ''अर्ध्या तासात परत या'' अशा सूचना दिल्या जात असल्याने पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

राजपुरीतील शिडाच्या बोटधारकांचा दावा आहे की, किल्ल्याच्या मागील बाजूस समुद्रातील वारे आणि लाटांचा जोर अधिक असल्याने शिडाच्या बोटीने तेथे जाणे अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार केवळ शिडाच्या बोटींसाठी खुले ठेवावे, अशी त्यांची मागणी आहे.

संप मिटवण्यासाठी मेरीटाईम बोर्डाचे अधिकारी एम. पवार यांनी स्वतः शिडाच्या बोटीतून नव्या जेट्टीकडे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, समुद्रातील लाटांचा तडाखा आणि वाऱ्याचा वेग यामुळे बोट नेण्यात मोठ्या अडचणी आल्या. त्यानंतर त्यांनी पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पर्यटकांची गैरसोय टाळण्यासाठी मुख्य प्रवेशद्वार मर्यादित स्वरूपात खुले ठेवण्याची विनंती केल्याची माहिती समोर आली आहे.

येत्या २६ मेपासून समुद्रातील हवामान खराब होण्याची शक्यता लक्षात घेता नियमानुसार बोटसेवा बंद होणार आहे. त्याआधीच निर्माण झालेल्या या वादामुळे स्थानिक बोट व्यावसायिकांच्या रोजीरोटीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. खोरा बंदरातून यांत्रिकी बोटीने पर्यटकांना किल्ल्यावर नेले जात असले तरी तेथील जेट्टीवर उन्हापासून संरक्षणासाठी शेडची व्यवस्था नसल्याने पर्यटकांना कडक उन्हात उभे राहावे लागत आहे. त्यामुळे पर्यटकांनी प्रशासनाच्या नियोजनावर नाराजी व्यक्त केली आहे.

नवीन जेटी सुरक्षित आहे, पण पर्यटकांना किल्ला पाहण्यासाठी पुरेसा वेळ मिळायला हवा. घाईगडबडीत पर्यटनाचा आनंदच निघून जातो.

– एक पर्यटक, पुणे

## टोल पूर्ण, रस्ता अपूर्ण

कर भरते, टोल भरते, पण बदल्यात मिळतंय काय? धूळ, खड्डे आणि मृत्यूचा सापळा! ही विकासाची भाषा नसून जनतेच्या पैशावर चाललेली निर्दयी वसुली आहे, असा घणाघात चित्रलेखा पाटील यांनी केला.

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना महामार्गाच्या अपूर्ण कामांमुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा नसल्याने रस्ते चिखलमय होत आहेत. वाहनचालकांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. 'सरकारला कोकणवासियांच्या जीवाची किंमत उरली आहे का? अपूर्ण रस्त्यावर टोल वसूल करणे म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. आता कोकणातील जनता गप्प बसणार नाही, असा इशारा देत चित्रलेखा पाटील यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत टोलवसुली तात्काळ बंद करावी, अपघातग्रस्त कुटुंबांना मदत द्यावी आणि निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

## राष्ट्रवादीत तटकरे, पटेलांना स्थान नाही?

दूर ठेवण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

विशेष म्हणजे, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या शपथविधीसाठी गुवाहाटीला गेलेल्या प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना ही माहिती मोबाईलवरून समजल्याची चर्चा आहे. त्याच विमानात सुनेत्रा पवारही प्रवास करत होत्या, मात्र या बदलांची कोणतीही कल्पना त्यांनी दिली नसल्याचे बोलले जात आहे.

या यादीवरून सोशल मीडियावर आणि पक्षांतर्गत नाराजी व्यक्त होताच सुनेत्रा पवार यांनी खुलासा करत, ''यादीत काही तांत्रिक चुका झाल्या असून लवकरच दुरुस्ती करण्यात येईल,'' असे म्हटले. मात्र, या स्पष्टीकरणानंतरही पक्षातील अंतर्गत मतभेद आणि गटबाजी पुन्हा एकदा उघड झाल्याचे चित्र दिसत आहे.

दरम्यान, पक्षात पार्थ पवार यांचा प्रभाव झपाट्याने वाढत असल्याची चर्चा आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवकांची स्वतंत्र टीम, कायदेतज्ज्ञ आणि व्यावसायिकांचा गट त्यांच्यासोबत कार्यरत असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादीतील या घडामोडींमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात पक्षातील अंतर्गत राजकारण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

नव्या यादीत कोणाला काय?

पार्थ पवार- राष्ट्रीय सरचिटणीस, जय पवार- राष्ट्रीय सचिव, शिवाजीराव गर्जे- मुख्य कोषाध्यक्ष, अभिषेक बोके- राष्ट्रीय सचिव, अविनाश आडिक- राष्ट्रीय सचिव

## जरांगेंचा पुन्हा आंदोलनाचा इशारा

**मुंबई :** मराठा समाजाची शासन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिशाभूल व फसवणूक केल्याचा आरोप करत मनोज जरांगे यांनी ३० मे रोजी अंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे पुन्हा एकदा मोठे आंदोलन आणि बेमुदत उपोषण करणार असल्याची घोषणा केली. शनिवारी (दि. १६) अंतरवाली सराटी येथे झालेल्या जाहीर बैठकीत त्यांनी ही माहिती दिली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे.
- सर्वप्रकारचे आजार (लठ्ठपणा/संतानप्राप्ती/मधुमेह/कॅन्सर इ) विवाह १८-१००, गुंतवणूकीवर दरमहा १८% सोनेतारणावर बिनव्याजी कर्ज घरबसल्या लाखो कमविणेसाठी प्रत्येक वस्तूवर ५०% सुट होमव्हिजीट उपलब्ध वेळ ठरवूनच डॉ. नथुराम शिहू, भैरवनाथ मंदिराजवळ (नागोठणे-पोयनाड रोड) रायगड ४०२१०६, मोबा. ७५०७१६६०१५/७०२००८५२०९/९४२२१४८२०३
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- पिकवर ड्रायवर हवा आहे. पगार : १८०००/- मो. ८००७८९३२३२, ८८०६६८३२३२
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे. ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321
- मांडवा जेट्टीजवळ लुमा रिसॉर्टमध्ये अकाऊंटट पाहिजेत. शिक्षण- ग्रॅज्युएशन, संगणक नॉलेज, टॅली, एक्सेल. मो. ९१४६३८३२५२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक भानुदास शिवाजी येवले यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १५२ | ४ | ०-६३-०० | ०-६१ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १७/०५/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक हर्षद अशोक भोपतराव यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २ | १४ | ०-१२-७० | ०-२८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १७/०५/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### जाहीर नोटिस

सदरहू अधिवक्त्यामार्फत, माझे ग्राहक मेसर्स ऑरेकल रिॲल्टी डेव्हलपर्स यांच्या भागीदारांच्या वतीने व त्यांच्या सूचनेनुसार सर्वसामान्य जनतेस यान्वये जाहीर सूचना देण्यात येते की, माझे ग्राहक हे खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांचे कायदेशीर मालक व/किंवा हक्कधारक आहेत. सदर मालमत्ता मौजे आसळ, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र - ४१०२०१ येथे स्थित असून ''मॉन्टे व्हिलिना'' या नावाने ओळखल्या जातात (यापुढे एकत्रितपणे ''सदर मालमत्ता'' असा उल्लेख करण्यात येईल):

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशील सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | पोटखराबासह क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | सर्व्हे नं. ५० | २ A २ | ००H.२२ R |
| २ | सर्व्हे नं. ५० | २ B | ००H.२७.३ R |
| ३ | सर्व्हे नं. ५० | २ C | ००H.३२.९ R |
| ४ | सर्व्हे नं. ५० | ५ | ००H.११.९ R |
| ५ | सर्व्हे नं. ५१ | १ | ००H.५१.६ R |
| ६ | सर्व्हे नं. ५१ | २ | ००H.२४.३ R |
| ७ | सर्व्हे नं. ५२ | १ A | ००H.३७ R |
| ८ | सर्व्हे नं. ५२ | १ B | ००H.४० R |
| ९ | सर्व्हे नं. ५२ | १ C | ००H.१३ R |
| १० | सर्व्हे नं. ५२ | १ D | ००H.४९ R |
| ११ | सर्व्हे नं. ५२ | ४ C | ००H.४१ R |
| १२ | सर्व्हे नं. ५२ | ८ A | ००H.१८ R |
| १३ | सर्व्हे नं. ५० | ९ D | ००H.२० R |
| १४ | सर्व्हे नं. ५० | १० | ०१H.०६ R |
| १५ | सर्व्हे नं. ५० | ४ | ००H.४२.५ R |
| १६ | सर्व्हे नं. ५० | १A | ००H.३८.९ R |
| १७ | सर्व्हे नं. ५० | २A/१ | ००H.२२ R |
| १८ | सर्व्हे नं. ५० | ३ | ००H.३०.३ R |
| १९ | सर्व्हे नं. ५२ | १E | ००H.२८ R |
| २० | सर्व्हे नं. ५२ | ३ | ००H.०६ R |
| २१ | सर्व्हे नं. ५२ | ४A | ००H.७८ R |
| २२ | सर्व्हे नं. ५२ | ४E | ००H.३९ R |
| २३ | सर्व्हे नं. ५२ | ४D | ००H.२९ R |
| २४ | सर्व्हे नं. ५२ | ५A | ००H.११ R |
| २५ | सर्व्हे नं. ५२ | ८B | ००H.०६ R |
| २६ | सर्व्हे नं. ५२ | ९A-१ | ००H.२३ R |
| २७ | सर्व्हे नं. ५२ | ९A-२ | ००H.४० R |
| २८ | सर्व्हे नं. ५२ | ९B | ००H.९३ R |
| २९ | सर्व्हे नं. ५२ | ९C | ०१H.३१ R |
| ३० | सर्व्हे नं. ५२ | ९E | ००H.२० R |
| ३१ | सर्व्हे नं. ५२ | ९F | ००H.२० R |

वरील तक्त्यात नमूद एकूण जमीन क्षेत्रफळ १० हेक्टर आहे.

तसेच,

मौजे आसळ, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र - ४१०२०१ येथील मालमत्ता.

मेसर्स ऑरेकल रिॲल्टी डेव्हलपर्स यांच्या भागीदारांनी दिनांक ३०/०९/२०११ रोजी श्री. सुरेश जाधव नकुम यांच्या नावे मुखत्यारपत्र (Power of Attorney) निष्पादित केले होते. सदर मुखत्यारपत्र हे कर्जत-२ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दिनांक ३०/०९/२०११ रोजी अनुक्रमांक KJR२-८५४८-२०११ अंतर्गत विधिवत नोंदणीकृत करण्यात आले होते.

या सार्वजनिक सूचनेद्वारे सर्व संबंधितांना स्पष्टपणे कळविण्यात येते की, वरील दिनांक ३०/०९/२०११ चे मुखत्यारपत्र, नोंदणी क्र. ८५४८/२०११, जे दुय्यम निबंधक कार्यालय, कर्जत, जि. रायगड येथे नोंदणीकृत आहे, ते श्री. सुरेश जाधव नकुम यांच्या संदर्भात तत्काळ प्रभावाने रद्द, समाप्त व अमान्य करण्यात आलेले आहे आणि ते सर्व प्रकारे निष्प्रभ व अवैध समजण्यात येईल.

त्यामुळे, श्री. सुरेश जाधव नकुम यांना माझ्या ग्राहकांच्या वतीने सदर मालमत्तेबाबत कोणताही हक्क, मालकी, स्वारस्य अथवा अधिकार राहिलेला नाही. तसेच त्यांना कोणताही व्यवहार करणे, प्रतिनिधित्व करणे, वाटाघाटी करणे, करार करणे किंवा सदर मालमत्तेशी संबंधित कोणतेही व्यवहार करण्याचा अधिकार राहिलेला नाही.

सर्व विकासक, शासकीय संस्था, वित्तीय संस्था व सर्वसामान्य जनतेस यान्वये सक्त ताकीद देण्यात येते की, श्री. सुरेश जाधव नकुम यांनी सदर मालमत्तेबाबत केलेल्या कोणत्याही प्रतिनिधित्वावर विश्वास ठेवू नये किंवा त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. कोणीही व्यक्ती त्यांच्याशी व्यवहार केल्यास तो पूर्णपणे त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर असेल आणि त्यातून उद्भवणाऱ्या खर्च व परिणामांसाठी माझे ग्राहक जबाबदार राहणार नाहीत.

याव्यतिरिक्त, श्री. सुरेश जाधव नकुम यांनी केलेली कोणतीही अनधिकृत, बेकायदेशीर अथवा त्यांना देण्यात आलेल्या अधिकाराच्या मर्यादेबाहेरील कृती, व्यवहार किंवा दस्तऐवज माझे ग्राहक मान्य किंवा प्रमाणित करीत नाहीत आणि ते कोणत्याही प्रकारे माझ्या ग्राहकांवर बंधनकारक राहणार नाहीत.

सर्वसामान्य जनतेने याची नोंद घ्यावी.

कोणताही दावा/हरकत असल्यास कृपया खालील पत्त्यावर कळवावे

**ॲड. करण भन्साळी**
भन्साळी ॲंड पळेकर
२०१, हार्लीन हाइट्स, राजे साहजी मार्ग,
लाभ दर्शन बिल्डिंग जवळ, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८.
ई-मेल : raveenpalekar@gmail.com
संपर्क क्र.: ९८९२०५९७३६

# रायगडचा तरुण घेणार 'गगनभरारी'

## अलिबागमध्ये अत्याधुनिक स्किल ट्रेनिंग सेंटरची सुरुवात

## एव्हिएशन, हॉस्पिटेलिटी आणि हेल्थकेअर क्षेत्रात रोजगाराची सुवर्णसंधी

| संतोष राऊळ |

| अलिबाग |

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे रायगड जिल्ह्याच्या विकासाला नवे पंख मिळत असताना, आता स्थानिक युवकांसाठी रोजगार आणि करिअरच्या नव्या वाटाही खुल्या होत आहेत. त्यामुळे आज रायगडचा तरुण 'गगनभरारी' घेण्यासाठी सज्ज होत आहे. अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात शनिवारी (दि.१६) आधुनिक स्किल ट्रेनिंग सेंटरचे उद्घाटन करण्यात आले असून, एव्हिएशन, हॉस्पिटेलिटी आणि हेल्थकेअर क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी हे केंद्र मोठी संधी ठरणार आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटी आणि आयईएसपी यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील पीनपी नाट्यगृहात विशेष रोजगार आणि करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आयईएसपी संस्थेचे प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी गॅरी खन्ना यांनी तरुणांना प्रेरित करताना सांगितले की, देशात विमानतळ आणि एअरलाईन्स उद्योग झपाट्याने विस्तारत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे अलिबाग आणि रायगड परिसराचे महत्त्व आणखी वाढले आहे. येत्या काळात हजारो रोजगार निर्माण होणार आहेत. मात्र, या संधी मिळवण्यासाठी स्थानिक युवकांनी स्वतःला कौशल्यपूर्ण बनवणे अत्यावश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, आज ग्रामीण भागातील अनेक युवकांमध्ये क्षमता आहे, पण योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाचा अभाव आहे. म्हणूनच आम्ही हे प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. मेहनत, आत्मविश्वास आणि योग्य प्रशिक्षण असेल तर रायगडातील युवक देशभरात आपली छाप पाडू शकतात.

यावेळी शेकाप महिला राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी स्थानिक युवकांच्या रोजगाराचा मुद्दा ठामपणे मांडला. जिल्ह्यातील तरूण बेरोजगार राहू नये, हीच माझी खरी इच्छा आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर युवकांना योग्य दिशा आणि रोजगार मिळणे गरजेचे आहे. गावागावातील मुलांना मोठ्या शहरांत भटकंती करावी लागू नये म्हणून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, या प्रशिक्षण केंद्रामध्ये एअर होस्टेस, केबिन क्रू, एअरपोर्ट ऑपरेशन, एअरपोर्ट मॅनेजमेंट, हॉस्पिटेलिटी, ग्राहक सेवा, हेल्थकेअर सपोर्ट, कॉर्पोरेट ट्रेनिंग, कम्युनिकेशन स्किल्स, ग्रूमिंग आणि व्यक्तिमत्त्व विकास यांसारखे विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोर्स पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगार सहाय्यही देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी हे केंद्र करिअर घडविण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र रोजगार फोरमही तयार करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांतच अनेक युवकांना विविध क्षेत्रात नोकऱ्या मिळवून देण्यात आल्या आहेत. हा उपक्रम फक्त प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून, युवकांना प्रत्यक्ष रोजगाराशी जोडण्यावर आमचा भर आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.




● (छायाचित्रः समीर मालोदे)

यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, पीएनपी ग्रुपचे प्रमुख उद्योजक नृपाल पाटील, उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, पाणीपुरवठा सभापती अनिल चोपडा, प्रदीप नाईक, माजी जि.प. सदस्य द्वारकानाथ नाईक, राष्ट्रवादीचे ॲड. प्रवीण ठाकूर, माजी जि.प. सदस्य काका ठाकूर, शेकाप तालुका सरचिटणीस सुरेश घरत, शेकाप ज्येष्ठ नेते अनिल पाटील, ॲड. के.डी. पाटील, पंचायत समिती सदस्य अंजली पाटील, नगरसेवक अंकित बंगेरा, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, नागाव सरपंच हर्षदा मयेकर, आक्षी सरपंच रश्मी पाटील यांच्यासह शेकाप कार्यकर्ते, पदाधिकारी, एअरवॅट ग्रुपच्या रिजनल हेड दीप्ती वीरकर, आयईएसपी कंपनीची टीम आणि पीएनपी टीम आदींसह विद्यार्थी, पालक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षण केंद्रामुळे अलिबाग, मुरुड, रोह्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील युवकांसाठी रोजगाराचे नवे दरवाजे खुले होणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

### युवकांसाठी उपलब्ध अभ्यासक्रम

- एअर होस्टेस प्रशिक्षण
- केबिन क्रू
- एअरपोर्ट ऑपरेशन व मॅनेजमेंट
- हॉस्पिटेलिटी आणि ग्राहक सेवा
- हेल्थकेअर सपोर्ट
- कम्युनिकेशन स्किल्स
- व्यक्तिमत्त्व विकास आणि ग्रूमिंग
- कॉर्पोरेट ट्रेनिंग
- प्लेसमेंट सहाय्य

### आजपासून प्रशिक्षण केंद्राची सुरूवात

पीएनपी एज्युकेशन सोसायटी आणि आयईसपी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१७) गोंधळपाडा-वेश्वी येथील पीनपी एज्युकेशन सोसायटीच्या मुख्य कार्यालयात अत्याधुनिक स्किल ट्रेनिंग सेंटरची सुरुवात होणार आहे. या ठिकाणी विमानतळ क्षेत्रातील विविध नोकरींच्या संधीबाबत सविस्त माहिती दिली जाणार आहे. अनुभवी तज्ज्ञांकडून करिअर मार्गदर्शन, कौन्सिलिंग, शंका निरसन, थेट मुलाखती व प्राथमिक निवड प्रक्रियांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अलिबागसह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने युवकांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील व आयईसपी कंपनीतर्फे करण्यात आले आहे.

### पाटील कुटुंबियांसाठी शिक्षण, रोजगार जिव्हाळ्याचे

पाटील कुटुंबियांच्या चारही पिढ्यांसाठी शिक्षण आणि रोजगार हा एक फार जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा विषय आहे. जेव्हा स्वर्गीय नारायण नागू पाटील यांनी चरीचे आंदोलन केलेले, तेव्हा शेतकऱ्यांसह अनेकांना रोजगार दिला. तसेच स्व. दत्ता पाटील आणि स्व. प्रभाकर पाटील यांनी कोएसो, पीएनपीसारख्या संस्था उभ्या केल्या. जिल्हा परिषदेत अनेक शिक्षकांना नोकऱ्या दिल्या. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी आरडीसीसी आणि अर्बन बँकसारख्या बँकिंग क्षेत्राची दालने उभी केली आणि अनेक जणांना नोकऱ्या दिल्या. आज नृपाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध संस्थां सुरू करून हजारो स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. आज या संस्थेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आज अशी परिस्थिती आहे की, अनेक तरुणांच्या हातात पदवी आहे; पण रोजगार नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी कौशल्याधारित शिक्षणाची गरज आहे. म्हणूनच या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून युवकांना थेट उद्योग आणि सेवा क्षेत्राशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.





















मान्यवरांचा सत्कार



























विद्यार्थ्यांचा सत्कार







# निवडक

## आंतरराष्ट्रीय ई-संमेलन उत्साहात

**चिरनेर** : 'उद्योजकता आणि व्यवस्थापनातील उदयोन्मुख प्रवाह' या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय ई-संमेलन अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. हे संमेलन मुरुड-जंजिरा अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालय, श्रीवर्धन येथील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कला व वाणिज्य महाविद्यालय खारेपाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. यावेळी देश-विदेशातील मान्यवर, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रास्ताविक सादर करताना डॉ. साजिद शेख यांनी संमेलनाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, व्यवस्थापन क्षेत्रात नव्या प्रवाहांची ओळख करून देणे व संशोधनाला चालना देणे, हे या उपक्रमाचे प्रमुख ध्येय आहे. त्यांनी विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावरील संधींचा लाभ घ्यावा असेही आवाहन केले. प्रमुख भाषणात डॉ. वाल्मिक सरवदे यांनी डिजिटल युगातील व्यवस्थापनाचे बदलते स्वरूप स्पष्ट केले. त्यांनी उद्योजकतेत नवकल्पना आणि संशोधन यांचे महत्त्व अधोरेखित करत जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कौशल्यविकास आवश्यक असल्याचे नमूद केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रेम भगवान आचार्य होते. या आंतरराष्ट्रीय ई-संमेलनामुळे विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना आणि संशोधकांना व्यवसाय व व्यवस्थापन क्षेत्रातील नव्या प्रवाहांची सखोल माहिती मिळाली. तसेच, संशोधनासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.

## ट्रॅव्हल बस-थार गाडीचा अपघात

**पनवेल** : ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात झाल्याने बसमधील चालक आणि प्रवासी जखमी झाले. या अपघाता प्रकरणी थार गाडीवरील चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अजय गणपत वाडकर हे जोगेश्वरी येथे राहात असून, ते ट्रॅव्हल्स बसने प्रवासी घेऊन महाबळेश्वर ते मुंबई असे येत होते. दरम्यान, पुणे-मुंबई महामार्गावरील अजिवली येथील एचएसपी ट्रॅफिक पोलीस चौकीजवळ बस घेऊन आले असता, एका थार गाडी चालकाने पनवेल एक्झिट नो एन्ट्री मार्गे रस्त्याच्या विरुद्ध दिशेने गाडी चालवली. आणि धोकादायक स्थितीत महामार्गार वळण घेऊन मुंबई दिशेकडे जात असताना अचानकपणे ट्रॅव्हल्स बसच्या समोर आला आणि अपघात झाला. या अपघातात अजय वाडकर आणि काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. या अपघातात दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.



## महानगर गॅस कामांची प्रत्यक्ष पाहणी

**पनवेल** : पनवेल महानगरपालिका अधिकारी, इंजिनिअर, महानगर गॅस अधिकारी तसेच परेश ठाकूर यांच्या सहाय्यकांसोबत महानगर गॅस कामांच्या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी महानगर गॅस लाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यांची तसेच सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती घेण्यात आली. पूर्ण झालेल्या महानगर गॅस कामांनंतर संबंधित रस्त्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणीची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. तसेच, नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. नागरिकांच्या सोयीसाठी आणि वाहतुकीची अडचण टाळण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली.

## शनी महाराज जयंती उत्साहात



**नेरळ** : श्री शनी अमावस्येनिमित्त नेरळ येथील शनैश्वर मंदिरात भक्तांनी गर्दी केली होती. नेरळ येथील शनी शक्तिपीठ आणि नवग्रह मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्री शनी जयंती उत्सवाच्या निमित्ताने नेरळ मोहाचीवाडी येथील श्री शनिश्वर मंदिरात सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. सकाळी आठ वाजता महाभिषेक झाल्यानंतर भक्तांसाठी शनी महाराज यांच्या प्रचंड शिळेवर जाण्यास परवानगी देण्यात आली. तर, दुपारी १२ वाजता शनि महाराज यांची महाआरती झाली. श्री शनी शक्तिपीठ आणि नवग्रह मंदिर देवस्थान ट्रस्टकडून भक्तांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. मंदिर ट्रस्टच्या अध्यक्ष वर्षा बोराडे तसेच विश्वस्त किरण बोराडे, कैलास खांगटे आणि पप्पू मिश्रा यांच्या माध्यमातून आयोजन केले होते. दुपारच्या सत्रात लक्ष्मी पूजन, कुबेर पूजन, शनिदेव शांती, नवग्रह होमहवन नाशिक स्थित हेमंत पाटील आणि जय गुरुदेव यांनी पौरोहित्य केले. शनि मंदिरात संध्याकाळी ज्ञानोबा तुकोबा वारकरी संस्थेच्यावतीने सामुदायिक हरिपाठ पठण झाले. कैलास भोईर आणि बळीराम गायकर यांनी या हरिपाठाचे नेतृत्व केले. त्यानंतर एकसल येथील जय हनुमान भजन मंडळ यांनी शनी गीतांचा कार्यक्रम सादर केला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## सिडकोची निष्कासन कारवाई

**पनवेल** : नवी मुंबईतील पुष्पकनगर नोड येथे सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत गुरूवारी (दि.१४) निष्कासन मोहीम राबविण्यात आली. सिडको संपादित पुष्पकनगर भूखंड क्रमांक २, सेक्टर २, पॉकेट नंबर २ हा गार्डनसाठी राखीव असून, त्या ठिकाणी सुरू असलेल्या सुशोभिकरण कामाला अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली. ही बांधकामे सिडकोच्या नियमावली व धोरणांचा भंग करून, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली असल्याने कारवाई करण्यात आली. ही मोहीम मुख्य दक्षता अधिकारी यांच्या निर्देशानुसार, अनधिकृत बांधकामे विभागाच्या मार्गदर्शनाखाली, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, महावितरणचे अधिकारी, सिडको व महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे पार पडली.

# विकासकामांच्या खोदकामामुळे वीजपुरवठा खंडीत

**● टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय ● पनवेलकरांची होणार त्रासातून सुटका**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील अत्यंत महत्त्वाच्या व वर्दळीच्या भागातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे हैराण झाले आहेत. विकासकामांच्या खोदकामात भूमीमगत वीजवाहिन्या तुटण्याचे प्रमाण वाढल्याने हा प्रश्न गंभीर बनला होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नगरसेवक ॲड. प्रथमेश सोमण यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विशेष समन्वय बैठकीची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आता टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



पनवेल शहरात सध्या काँक्रिटीकरणाचे आणि महानगर गॅसच्या जोडणीचे काम जोमाने सुरू आहे. मात्र, महापालिका आणि महावितरण यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने कंत्राटदारांकडून खोदकाम करताना वीजवाहिन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. त्यामुळे शहरातील टिळक रोड, महात्मा फुले रोड, एचओसी कॉलनीच्या मागील रोड, गडकरी मार्ग आणि महात्मा गांधी मार्ग या अत्यंत महत्त्वाच्या व वर्दळीच्या भागातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे हैराण झाले आहेत. नियमानुसार, रस्त्याच्या कामात आडव्या येणाऱ्या वाहिन्या कंत्राटदाराने स्वखर्चाने अंडरग्राऊंड करणे आवश्यक असताना, प्रशासकीय ताळमेळ नसल्याने या कामात दिरंगाई होत होती. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नगरसेवक ॲड. सोमण यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच, एका विशेष समन्वय बैठकीची देखील मागणी केली होती. सोमण यांच्या सूचनेनुसार व मागणीनुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत कोणत्याही रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी महापालिका, महावितरण आणि संबंधित कंत्राटदार यांची टास्क फोर्स प्रत्यक्ष जागेवर जाऊन समन्वय साधेल. त्यामुळे खोदकामात वाहिन्या तुटण्याचे प्रकार थांबणार असून, नागरिकांना विनाकारण अंधारात राहावे लागणार नाही, असा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, शहर अभियंता संजय कटेकर, महावितरणचे अधीक्षक अभियंता माने, शहर अभियंता सातपुते व देशमुख उपस्थित होते. तसेच, राहुल गोगटे, महेश सावंत, प्रसाद सोनावणे, अभिजीत साखरे, अर्जुन परदेशी, प्रकाश म्हात्रे, नरेश नरसिंगे, अराफत पटेल आणि मिलिंद निंबाळकर उपस्थित होते. प्रथमेश सोमण यांच्या पुढाकारामुळे शहरातील प्रलंबित वीज समस्या सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

### मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान

वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी लग्नाचे मंडप उडून गेले आहेत. तर, पावसामुळे सजावटीचे साहित्य भिजून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच, अचानक पडणाऱ्या पावसामुळे जेवणाची व्यवस्था, पूजा विधी आणि वऱ्हाडींच्या बसण्याची व्यवस्था कोलमडत आहे. मंडप डेकोरेटर्स यांच्यासह केटरिंग व्यावसायिकांचे देखील मोठे आर्थिक नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी त्यांना बुकिंग रद्द करावी लागत आहेत. ग्रामीण भागात घरासमोर मांडव टाकून होणाऱ्या लग्नांना याचा सर्वाधिक फटका बसत असून, अनेकजण आता सुरक्षिततेसाठी हॉलकडे वळत आहेत.

## जर्मन, जपानी भाषा प्रशिक्षण

**उरण** : आजच्या स्पर्धात्मक युगात नवनवीन कौशल्य विद्यार्थ्यांना आत्मसात करणे गरजेचे आहे. त्याचा एक भाग म्हणजे परदेशी भाषा अवगत असणे होय.

सद्यःस्थितीत जर्मनी आणि जपान या दोन देशांमध्ये मनुष्यबळाची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन आणि जर्मनी देशा अंतर्गत करार झाला असून, महाराष्ट्रातील १० हजार लोकांना रोजगाराची संधी त्यातून मिळणार आहे. तसेच, जपान देशासोबत झालेल्या करारानुसार ५ लाख लोकांना रोजगार संधी मिळणार आहे. मात्र, या देशांमध्ये जायचे असेल तर तेथील भाषा अवगत असणे आवश्यक आहे. याचा विचार करून उरण आणि परिसरातील गरजूंना कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयात जर्मन व जपानी भाषा प्रशिक्षण वर्ग नवीन शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येत आहेत. जर्मनीच्या प्रसिद्ध गोथें इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने तज्ज्ञ शिक्षक हे प्रशिक्षण देणार आहेत. भाषेचे प्रशिक्षण घेतल्या नंतर मुंबई व नवी मुंबई येथील जपानी व जर्मन उद्योगामध्ये नोकरीच्या संधी प्राप्त होणार आहेत. बारावी पास तसेच आय.टी.आय. विद्यार्थी, तंत्र शिक्षण घेतलेले, कौशल्य शिक्षण प्राप्त तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि प्रवेशासाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. डॉ. वाल्मिक गर्जे यांनी केले आहे.

## मुरूडमध्ये १९ मे रोजी पाणीपुरवठा बंद

**आगरदांडा** : मुरुड-जंजिरा नगर परिषद हद्दीतील नागरिकांसाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. मंगळवारी (दि.१९) जलशुद्धीकरण केंद्र तसेच गारंबी व सवतकडा धरण येथे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येणार असल्याने शहरातील सर्व भागांचा पाणीपुरवठा दिवसभर बंद राहणार आहे. नगरपरिषदेकडून नागरिकांना उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे, तसेच प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी केले आहे.

## कर्जत येथे भीम महोत्सव उत्साहात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत भीम महोत्सव समितीच्यावतीने दोन दिवसीय भीम महोत्सव साजरा करण्यात आला. पहिल्या दिवशी येथील पोलीस मैदानात प्रबोधन आणि दुसऱ्या दिवशी कर्जत शहरात मिरवणूक अशा प्रकारे भीम महोत्सव साजरा झाला.



कर्जत पोलीस मैदानात भीम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. भीम महोत्सव समितीचे अध्यक्ष सचिन भालेराव, सचिव कृष्णा जाधव आणि खजिनदार उदय जाधव यांच्या सह महोत्सव समितीने यावर्षी विविध कार्यक्रमांमधून भीम महोत्सव साजरा केला. दोन दिवसीय भीम महोत्सवाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून, पहिल्या दिवशी प्रबोधन आणि सांगीतिक मेजवानी देण्यात आली. त्यात प्रबोधनकार वक्ते हनुमंत पवार यांनी अतिशय प्रभावीपणे प्रबोधन करीत समाज जागृतीचे काम केले. तसेच, या महोत्सवात भीमगीत सादर केली. गायक चेतन लोखंडे, प्रतीक सोळस, आकाश तांबे, आणि अंजली यांनी आपल्या सुमधुर आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी अभिनेत्री वनिता खरात यांनी महोत्सवाला हजेरी लावत उपस्थितांमध्ये जोश निर्माण केला. कर्जतमधील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली होती.

## अनधिकृत बांधकामप्रकरणी तक्रार दाखल

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील घणसोली सेक्टर-७ परिसरातील सिम्प्लेक्स प्रकल्पामधील काही सहकारी गृहनिर्माण संस्थांविरोधात नवी मुंबई महापालिकेने कठोर भूमिका घेतल्याचे समोर आले आहे. अनधिकृत बांधकाम केल्याचा ठपका ठेवत महापालिकेच्या घणसोली विभाग कार्यालयाने रबाळे पोलीस ठाण्याकडे अधिकृत तक्रार पाठवून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची शिफारस केली आहे. या कारवाईमुळे घणसोली परिसरात मोठी चर्चा सुरू झाली असून, रहिवाशांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महापालिकेच्या पत्रानुसार, कै. अण्णासाहेब पाटील को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, तसेच घणसोली सेकक्टर ७ येथील ओम साईधाम को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीकडून आवश्यक परवानग्या न घेता बांधकाम करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी महापालिकेकडून संबंधितांना यापूर्वीच नोटीस बजावण्यात आली होती. अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत किंवा नियमांनुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, नोटीस दिल्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याचे महापालिकेने आपल्या पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे आता पुढील टप्प्यात पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

नवी मुंबई महापालिकेने रबाळे पोलीस ठाण्याकडे पाठविलेल्या पत्रासोबत पाहणी अहवाल, पंचनामा, नोटीसची प्रत आणि अन्य संबंधित कागदपत्रे जोडली असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणात पुरावे गोळा करूनच पुढील कारवाई सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे.

## अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल** : दुचाकीचा अपघात होऊन ५८ वर्षीय व्यक्ती गाडीसह दगडावर जाऊन आदळल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. योगेश पावशे (३६) हे तळोजा येथील रहिवासी असून, ते ॲक्टिवा घेऊन नेरे येथे जात होते. त्यांच्यासोबत त्यांचे वडील परशुराम पावशे (५८) हेदेखील होते. मोटारसायकल आंबिवली-नेरे रस्त्यावरील स्मशानभूमीच्या जवळ आली असता, रस्त्याच्या बाजूला असलेल्या दगडावर जाऊन आदळली.

## बाळूमामांच्या दर्शनाला अलोट गर्दी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

लोणावळा येथील पांगोळी धनगरवस्ती परिसरातील प्रसिद्ध श्रीसंत बाळूमामा मंदिरात अमावास्येनिमित्त शनिवारी हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तांची रांग लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या भव्य मंदिरात दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. मात्र, प्रत्येक अमावास्येला येथे विशेष भंडाऱ्याचे आयोजन करण्यात येत असल्याने राज्यभरातून भक्त मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात. शनिवारीही सकाळपासून महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी श्रीसंत बाळूमामांचे दर्शन घेत आशीर्वाद प्राप्त केला. गेल्या बारा वर्षांपासून पांगोळी धनगरवस्ती येथे उभारण्यात आलेले हे मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. आजच्या अमावास्या सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात भक्तांसाठी महाप्रसादाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. श्रीसंत बाळूमामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी नियोजनबद्ध व्यवस्था सांभाळत भाविकांची सेवा केली. मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## कुणबी समाज साले ग्रुपतर्फे नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुपतर्फे नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या कुणबी समाजातील नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम शनिवारी कुणबी भवन, माणगाव येथे आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम प्रमुख उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी साले ग्रुपचे अध्यक्ष सुभाष गुगळे होते. यावेळी बोलताना महादेवराव बक्कम यांनी समाजाच्या उन्नतीसाठी सर्व समाजबांधवांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. तर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती विलास शिंदे यांनी विविध शासकीय योजनांचा लाभ बहुजन समाजातील नागरिकांनी घ्यावा, असे सांगितले. यावेळी पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनीषा मालोरे तसेच सदस्य संगीता बक्कम, स्वाती करकरे, रवींद्र टेंबे आणि ज्ञानेश्वर पदरत यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## देवश्री डोईफोडेची निवड

**चिरनेर** : उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक उत्कृष्ट शाळा विंधणे या शाळेतील इयत्ता पाचवीच्या वर्गातील देवश्री महादेव डोईफोडे ही विद्यार्थिनी जवाहर नवोदय या विद्यालयात परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन, तिने घवघवीत यश संपादन केले आहे.



या यशाबद्दल जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे तिची पुढील शिक्षणासाठी निवड केली आहे. देवश्रीचे वर्गशिक्षक प्रवीण पाटील, मुख्याध्यापिका स्रग्धरा पाटील, तसेच पालकांचेदेखील अभिनंदन करण्यात येत आहे.

## नगरपरिषदेने हातगाड्या घेतल्या ताब्यात

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड समुद्रकिनारी अनेक टपरीधारक आहेत. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना न्याहारी व भोजन व्यवस्था, तसेच चहा व्यवस्था येथूनच मिळत असते. परंतु, याठिकाणी व्यवसाय करण्याचे प्रमाण अधिक वाढल्याने जो तो समुद्रकिनारी रस्त्याच्या कडेला हातगाडी टाकून व्यवसाय करू लागला आहे. त्यामध्ये काही हातगाडी व टपरीधारकांना मुरुड नगरपरिषदेची परवानगी असून, काही गाड्या अनधिकृतपणे लावण्यात आल्याची माहिती मुरुड नगरपरिषदेकडून



'कृषीवल'च्या प्रतिनिधीला देण्यात आली. दरम्यान, नागरिकांच्या आलेल्या तक्रारीनुसार मुरुड नगरपरिषदेने समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या दोन गाड्या ताब्यात घेतल्या आहेत. त्यातील एका गाडीवर रेखा कंटक या स्प्रिंग पोटॅटो विकत होत्या. तर, दुसरी हातगाडी ही चार वर्षांपासून बंद असून, संबंधित मालकाने कोणतीही परवानगी घेतलेली नाही. ही गाडी अगदी प्रवेशद्वाराजवळ ठेवण्यात आली होती.

त्यामुळे पर्यटक व स्थानिक नागरिकांना ये-जा करताना अडचण होत होती. या दोन्ही गाड्या नगरपरिषदेने ताब्यात घेतल्या आहेत. मुरुड नगरपरिषदेच्या या धडक कार्यवाहीने हातगाडीवाले चांगलेच धास्तावले आहेत.

**मेहनत अन् चिकाटीच्या जोरावर संकटांवर मात | गोधडी शिवून संसाराच्या उभारणीत हातभार**

# सुरेखा मुणेकरांची प्रेरणादाई कहाणी

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील रामवाडी येथील सुरेखा मुणेकर (५०) या गेली वीस वर्षे पारंपरिक गोधडी शिवण्याचे काम करत आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता त्यांनी गोधडी शिवण्याची परंपरा कायम ठेवली आहे. त्यांच्या कष्टातून आत्मनिर्भरतेचा आणि जिद्दीचा संदेश मिळतो. संकटे कितीही मोठी असली, तरी मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यावर मात करता येते, हे त्यांनी आपल्या आयुष्यातून दाखवून दिले आहे.

आपल्या कष्टाच्या जोरावर संसाराचा गाडा पुढे नेला आहे. गोधडी शिवण्याच्या या व्यवसायातून त्या केवळ घरखर्च भागवत नाहीत,



तर पतीच्या उपचारासाठी झालेले मोठे कर्जही फेडत आहेत. त्यांच्या संघर्षमय आयुष्याची कहाणी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

गोधडी हा ग्रामीण भागातील पारंपरिक आणि उपयुक्त असा वस्त्रप्रकार मानला जातो. जुन्या साड्या, कपडे यांचा पुनर्वापर करून तयार करण्यात येणाऱ्या गोधड्यांना आजही मोठी मागणी आहे. सुरेखा मुणेकर या सहा जुन्या साड्यांपासून एक गोधडी तयार करतात. प्रत्येक गोधडी काळजीपूर्वक आणि मजबूत शिवली जाते. एक गोधडी पूर्ण करण्यासाठी साधारण एक ते दीड दिवस लागतो. या मेहनतीच्या बदल्यात त्यांना एका गोधडीमागे २५० ते ३५० रुपये मिळतात. मात्र, त्यांनी रात्री जागून गोधड्या शिवल्या तर महिन्याला त्या जवळपास ४० गोधड्या शिवतात. मात्र, या कामासाठी लागणारी मेहनत, वेळ आणि डोळ्यांवर येणारा ताण याच्या तुलनेत मिळणारे उत्पन्न अत्यल्प असल्याचे त्या सांगतात. तरीही त्यांनी कधीही हार मानली नाही. काम केल्याशिवाय पर्याय नाही, असे सांगत त्या रोज सकाळपासून रात्रीपर्यंत गोधडी शिवण्याच्या काम ात व्यस्त असतात.

त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा आघात म्हणजे त्यांच्या पतीचा झालेला गंभीर अपघात. या अपघातानंतर उपचारासाठी तब्बल लाखो रुपयांचा खर्च झाला. या खर्चामुळे कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले. उपचारासाठी कर्ज घ्यावे लागले. आजही त्या गोधडी शिवून मिळणाऱ्या पैशातून घरखर्च, नवऱ्याचे औषधपाणी आणि कर्जाची परतफेड करत आहेत. सुरेखा यांच्या मते, गोधडी शिवण्याचे काम हे केवळ रोजगार नाही, तर एक कला आहे. प्रत्येक गोधडीत मेहनत आणि कलाकुसर दडलेली असते. जुन्या साड्यांपासून उपयोगी वस्तू तयार करून त्या पर्यावरणपूरक संदेशही देत आहेत. ग्रामीण भागातील अनेक महिला आजही अशा व्यवसायांवर अवलंबून आहेत; मात्र, त्यांना योग्य बाजारपेठ आणि शासनाची मदत मिळाल्यास त्यांचे जीवनमान उंचावू शकते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ मे

१) श्री.प्रभाकर बाळाराम इंदुलकर, चेंढरे, अलिबाग, दि.१७-५-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५

(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



अमृतबेन व प्रेमजी जिवराज जैन, अलिबाग



कै. अवंतिकाबाई हरी पाटील, स्मरणार्थ अलिबाग

कै.अमर रामचंद्र म्हात्रे, प्रथम पुण्यस्मरण, अलिबाग

श्री. मधुकर काशिनाथ पुणतांबेकर, स्मरणार्थ अलिबाग



कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील, स्मरणार्थ, अलिबाग



कै. रुक्मिणी विठोबा पाटील स्मरणार्थ, भाल, अलिबाग

अंकिता चंदन पाटील वाढदिवस अलिबाग

# रेल्वेकडून लाखो प्रवाशांची वाहतूक

## • चार महिन्यांत कोट्यवधींची कमाई

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण-नेरुळ-बेलापूर या रेल्वे मार्गावरील उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, शेमटीखार, खारकोपर, बामण डोंगरी, तारघर आणि गव्हाण या आठ स्थानकांतुन जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांतच ४५ लाख ६७ हजार ५४२ प्रवासी वाहतूक झाली आहे. या चार महिन्यांत मध्यरेल्वेने ३ कोटी ३६ लाख २९ हजार ५४५ रुपयांची कमाई केली आहे.




जानेवारी २०२४ पासून उरण-नेरुळ-बेलापुर या रेल्वे मार्गावरून प्रवासी वाहतूकीला अखंडपणे सुरूवात झाली आहे. गतवर्षी जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, शेमटीखार, खारकोपर आणि बामण डोंगरी या सहा स्थानकांतुन ४१ लाख ९७ हजार ११७ प्रवाशांची वाहतूक झाली होती. त्यावेळी मध्य रेल्वेने २ कोटी ५६ लाख ८९ हजार ८०७ रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर आता या रेल्वे मार्गावरील गव्हाण व तारघर ही दोन स्थानके कार्यान्वित झाली आहेत. त्यामुळे उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, शेमटीखार, खारकोपर, बामण डोंगरी, तारघर आणि गव्हाण या आठ स्थानकांतुन यंदा जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात ४५ लाख ६७ हजार ४६२ प्रवासी वाहतूक झाली आहे. त्यामुळे यंदा प्रवाशांच्या संख्येत ३ लाख ७० हजार ४२५ एवढी वाढ झाली आहे. मध्यरेल्वेने या चार महिन्यात ३ कोटी ३६ लाख २९ हजार ५४५ रुपयांची कमाई केली आहे. अशी अधिकृत माहिती मध्य रेल्वे प्रशासन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दरम्यान, एक-एक तासाच्या अंतराने सोडण्यात येणाऱ्या लोकलमुळे प्रवाशांना तास-दिड तासांपर्यंत ट्रेनसाठी प्रतिक्षा करावी लागते. नाहिलाजाने प्रवाशांना कंटाळून इच्छित स्थळी पोहचण्यासाठी इतर साधनांनी प्रवास करावा लागत आहे. तसेच, बेलापूर व उरण स्थानकातुन रात्री साडेदहा वाजता शेवटची लोकल सुटते. त्यामुळेही प्रवाशांची गैरसोय होत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने प्रयत्न करण्याची प्रवाशांची मागणी आहे.

**स्थानक - प्रवासी संख्या - कमाई**

१) उरण - ६,७३,८६१ - ६९,३०,४१४
२) द्रोणागिरी - ३,५३,६६० - २९,३२,५२७
३) न्हावा-शेवा - ३,७६,२४६ - २७,१४,२२७
४) शेमटीखार - ९३,७४९ - ७,६८,८२९
५) खारका - ८,९१,४१० - ४८,५०,६९८
६) बामण डोंगरी - २०,२२,५९० - १,४४,६५,२६२
७) तारघर - ६४,१२१ - ३,६४,९६४
८) गव्हाण - ९१,८२५ - ६,०२,६२४

## रोह्याच्या नगरसेवकांचा अभ्यास दौरा




| रोहा | प्रतिनिधी |

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनगराध्यक्ष, सर्व सभापती, नगरसेवक व नगरसेविका सद्या मध्य प्रदेशातील इंदौर येथे अभ्यास दौऱ्यावर गेले. या अभ्यास दौऱ्यातून तेथील शहरातील प्रगत कचरा व्यवस्थापन प्रणालीची सखोल पाहणी करण्यात आली. या दौऱ्यात गोबरधन (शेण खत) बायो सीएनजी प्लँटला भेट देण्यात आली. येथे ओल्या कचऱ्यापासून बायो सीएनजी तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.

या प्रकल्पाच्या माध्यमातून दररोज सुमारे ५०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करून जवळपास १७,००० किलो बायो सीएनजीनिर्मिती केली जाते. त्यातील सुमारे ५० टक्के इंधन इंदौरमधील सार्वजनिक बस सेवेसाठी वापरले जाते. तर, उर्वरित ५० टक्के ग्रीन फ्यूल म्हणून उद्योगांना पुरवले जाते. त्यानंतर नगरसेवक मंडळींनी येथील सुक्या कचऱ्यासाठी असलेल्या मटेरियल रीकव्हर फॅसिलिटी या सेंटरला भेट दिली. येथे कचऱ्याचे १८-२० प्रकारांमध्ये वर्गीकरण कसे केले जाते व त्यानंतर त्यावर प्रक्रिया कशी केली जाते याबाबत सविस्तर माहिती व मारगदर्शन करण्यात आले. शेवटी कन्स्ट्रक्शन अँड डीमोलिशन वेस्ट प्रोसेसिंग प्लँटची पाहणी करण्यात आली.

# रक्तदात्यांनी केले उत्स्फूर्त रक्तदान

| महाड | प्रतिनिधी |

महाडमधील जमीय जमातून मुस्लिमीन या संस्थेने आयोजित केलेल्या आजच्या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी उदंड प्रतिसाद दिला. यावेळी ३४ रक्तदात्यांनी रक्तदान करून एक समाजाला नवा संदेश दिला. संस्थेचे अध्यक्ष दिलदार पुरकर यांनी, आपल्या एका रक्तदानामुळे कोणाचातरी जीव वाचू शकतो, असा संदेश दिला. या कार्यक्रमाला महाड डीवायएसपी शंकर काळे हे उपस्थित होते. तसेच, डॉ. हिम्मतराव बावसकर, वजीर कोंडीवकर, गीतांजली महाडिक, मेहबूब कडवेकर, अकबर ताज, सत्तार तरे, फैयाज काळसेकर, अब्दुल्हक खालफे, फहीम आलेकर, इम्रान कौचाली, ईलयास ढोकले, मेहबूब ढोकले यांसह जनकल्याण रक्त केंद्राची संचालक शिवराज भागवत यांनी आवर्जून भेट दिली.



## सन्मान पाटील यांचा सत्कार

| वाघ्रण | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातीला वाघ्रण येथील ॲड. सन्मान पाटील न्यायाधीश झाल्याबद्दल त्यांचा ज्येष्ठ नागरीक संघ वाघ्रण-खारपेढांबेच्यावतीने सत्कार करण्यात आला. ॲड. सन्मान पाटील हे वाघ्रणचे ॲड. प्रमोद पाटील यांचे सुपुत्र असून, ते प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर परीक्षा यशस्वी झाल्या बद्दल हा सत्कार करण्यात आला.



प्रास्ताविक दिपक पाटील यांनी केले. या सोहळ्याला हरिश्चंद्र पाटील, दशरथ पाटील, अभिमन्यू पाटील, बळवंत गावंड, हरीश्चंद्र भोईर, अनंत धोदरे, शिरीष पाटील, प्रमोद धोदरे, दयानंद म्हात्रे आदी उपस्थित होते.

## मळेघरवाडीत दोन दिवसीय सोहळा

**वढाव :** पेण तालुक्यातील मळेघरवाडी येथे जय भवानी भजन मंडळ मळेघरवाडीचा शताब्दी महोत्सव दि.१६ व १७ मे रोजी उत्साहात साजरा होत आहे. या भजन मंडळाला यंदा १०० वर्षे पूर्ण होत असल्याने विविध धार्मिक, सांस्कृतिक व संगीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि.१६) सकाळी ध्वज, टाळे, मृदंग व वीणा पूजन, अभिषेक, महापूजा, सायंकाळी नामदेव मोरे, संदीप मोरे, गजानन म्हात्रे, कुमार पाटील व दत्तात्रेय मोकल यांचे चक्रीभज पार पडले. तर, रात्री स्नेहा भोसल-साळेकर यांचे वारकरी कीर्तन पार पडले. रविवार (दि.१७) रायगड, ठाणे व नवी मुंबई येथील नामवंत भजन मंडळांच्या संगीत भजन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# रावढळ येथे महाराजस्व शिबीर उत्साहात

| महाड | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर मंडळ तुडील विभागात शुक्रवारी (दि.१५) न्यू इंग्लिश स्कूल रावढळ येथे पार पडले. महाराजस्व समाधान शिबिराचा पहिल्या टप्प्यातील हा शेवटचा शिबीर होता. यावेळी तुडील मंडळातील नागरिकांनी शिबिरामध्ये देण्यात आलेल्या १५ विविध सेवांचा पुरेपूर लाभ घेऊन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या विशेष शिबिरात उद्घाटक महाड तहसीलदार महेश शितोळे यांच्यासह महाड भुमिअभिलेख उपअधीक्षक भगत, सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, पोलीस पाटील, सरपंच व शेतकरी बांधव उपस्थित होते. सुरुवातीला महाड तहसीलदार महेश शितोळे यांनी उपस्थित लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सेवांविषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांतर्गत सर्व शासकीय यंत्रणा उपस्थित राहून त्यांनी त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना दिला. यावेळी देण्यात आलेल्या सेवांमध्ये महसूल विभागातील प्रलंबित फेरफार, ७/१२ उताऱ्यावरील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरी ७/१२ उतारे, ८-अ उताऱ्याचे वाटप, उत्पन्न रहिवास जातीचे प्रमाणपत्र वाटप, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र वाटप, आकृतिक तरतुदी बद्दल मार्गदर्शन, सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसाह्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांचे दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबतच्या प्रकरणांचा निपटारा, पांणद रस्त्याचा प्रशासकीय मान्यतेचा आदेश, घरासाठी पट्टे वाटप व ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक व पी.एम. किसान नोंदणी, कमी जास्त पत्रके भूसंपादन आकृषिक नोंदी मात्र दप्तर आद्यबाबत करणे या सेवांचा समावेश होता.



# साप्ताहिक राशिभविष्य दि. १७ ते २३ मे २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## मोठे यश मिळण्याची शक्यता



**मेष :** राशीधारकांनी आपले या सप्ताहातील आपले ग्रह आपल्याला साथ देणारे ठरणार आहेत. आपण जे प्रयत्न कराल त्यात यश मिळणार आहे. मोठे यश मिळाले नाही तरी लहान लाहान यशाने आपण काही कालावधीत शिखरावर पोहचलेले दिसाल. नवीन गोष्टी बाबत बाहू करू नका. हळू हळू सर्व आपल्या अंगवळणी पडणार आहे. अनामिक भीती कमी होईल. शुभत्व वाढेल. ग्रहांचे परिणाम जाणवतील. व्यापार-उद्योगातील गडबड, गोंधळ कमी होईल. कारखानदारी, मोठे उद्योग आता रुळावर येतील. त्यासाठी कर्मचारी वर्गाचा मोठा वाटा असेल. नोकरीतील परिस्थिती समाधानकारक राहील. त्यामुळे कामावर लक्ष केंद्रित होईल. रोजच्या रोज ठरलेले कामाचे परतावे चांगले राहतील. अनेक अडचणींवर मात कराल. तुमची चिकाटी तुमचे यश पूर्णत्वाला नेईल. आर्थिकदृष्ट्या परिपक्वता येईल. राजकीय क्षेत्रात विकासाच्या दृष्टीने वाटचाल चालू राहील. भाऊबंदकी व शेजारीपाजाऱ्यांच्याशी मात्र दोन हात लांबच राहा. **महिलांना :** तुमच्यातील सकारात्मक बदल घरातील सर्वानाच आनंद देणारा ठरेल. उपासनेत मन रमवा. शारीरिक समतोल उत्तम राखण्यात यश मिळेल. **शुभ दिनांक :** १८,२०.

## नावीन्यपूर्ण गोष्टी उदयास येतील



**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमाना प्रमाणे शुभ ग्रहांची ताकद वाढेल. उत्साह निर्माण होईल. व्यापारी क्षेत्रातील व्याप वाढता राहील. नावीन्यपूर्ण गोष्टी उदयास येतील. हाताबाहेरच्या गोष्टी आवाक्यात राहतील. व्यवसायातील संभ्रमित स्थिती बदलेल. नोकरदार व्यक्तीने प्रत्येक दिवस मोजत राहणे टाळा. तणावमुक्त राहा. कामावर लक्ष द्या. हेवेदावे बाजूला ठेवा. नोकरीतील सध्याचा सूर लक्षात घ्या. नेमक्या गोष्टी करण्याचा आढावा घ्या. शक्य तितक्या लवकर परिस्थिती स्वीकारण्याचा प्रयत्न करा. पैशांच्या बाबतीत जमेची बाजू राहील. राजकीय क्षेत्रात विजय संपादन कराल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या आवडीनिवडीचा विचार करा. जोडीदारासमवेत असलेला अबोला मिटेल. नात्यातील स्नेह वाढेल. धार्मिक गोष्टीतून समाधान मिळेल. मनाची एकाग्रता वाढेल. प्रकृती ठणठणीत राहील. **महिलाना :** पाऊल सावकाश टाका वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल, धन संबंधित गुंतवणूक विचार पूर्वक करा. **शुभ दिनांक :** १६,१७.

## मोठ्याचा सल्ला घ्या



**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे तारेवरची कसरत आता संपणारी असली तरी प्रयत्न सोडून चालणार नाही. सतत कष्ट करणे हे मनात ठेवून प्रयत्नवादी राहणे उत्तम राहील. दोन कामांऐवजी एकाच कामाकडे लक्ष दिले तर निश्चितच नुकसान होणार नाही. चालू क्षेत्रातील व्यवसायाला चिकित्सकपणे आत्मपरीक्षण करणे गरजेचे राहील. खोल विचार करताना वेगवेगळ्या गोष्टींवर नजर फिरवावी लागेल. व्यवसायातील चढ-उतार हे नेहमीप्रमाणेच राहतील. नोकरदार व्यक्तीने स्वत:चा आत्मविश्वास न गमावता ठामपणे उभे राहा. कामातील अडचणी सोडवण्यासाठी मोठ्याचा सल्ला घ्या. तो आपल्याला अनुभव म्हणून उपयोगी पडेल, मर्यादित खर्च केल्यास कर्जाचा भार थोडा हलका होईल. नवीन कर्जाच्यामागे सध्यातरी लागू नका, मुलांना योग्य समज देण्याची गरज राहील. प्रकृती नरम-गरम असेल. **महिलाना :** भावनिक प्रश्नात अडकू नका, भावनेपेक्षा थोड मेंदूच्याविचाराने कार्यकरा करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल. **शुभ दिनांक :** १८,१९.

## आर्थिक बाजू ठीक राहील



**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात ग्रहस्थिती चांगली पोषक आहे. लांबलेल्या प्रश्नांना चांगले मार्ग मिळत राहतील. प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी आतून उत्साह वाढेल. समाधानाचे आणि प्रगतीचे नवे मार्ग समोर दिसू लागतील. व्यापार-व्यवसायात जुन्या ओळखीचा उपयोग करू शकाल. शक्यतो नव्याने कोणतीही जबाबदारी स्वीकारू नका. नोकरदार व्यक्तींची वाटचाल भरधाव राहील. कामातील धरसोडपणा कमी होईल. तडजोडीतून मिळणारे यश लक्षणीय असेल. आर्थिक प्रगतीच्या वाटा दिसू लागतील. राजकीय क्षेत्रात नको त्या ठिकाणी मध्यस्थी करणे टाळा. मुलांच्या बाबतीत चांगली प्रगती दिसू लागेल. मात्र, नको त्या गोष्टीचा अट्टहास पुरवू नका. कौटुंबिक जीवन अनुकूल निर्णयांनी आणि शुभ घटनांनी समृद्ध राहील. शारीरिक व मानसिक विकारांपासून सावध राहा. **महिलाना :** कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभ दिनांक :** २०,२१.

## प्रकृतीची काळजी घ्या



**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाच्या चंद्राचे भ्रमण होत असताना त्याचा परिणाम या राशीवर होणार आहे. मानसिकदृष्ट्या हतबल न होता प्रकृतीची काळजी घ्या. मानसिक दडपण घेऊन कोणतेही कार्य सिद्ध होत नाही हे लक्षात घ्या. व्यवसायात सध्या तरी नको ते धाडस वाढवू नका. चालू घडी सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करा. निर्थक गोष्टीत वेळ न दवडता ठरावीक काळापुरताच विचार करणे सोयीचे ठरेल. इतरांची मदत घेताना काळजी घ्या. नोकरदार व्यक्तीला प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे फळ चांगले मिळेल. आर्थिक बाबतीतील चढ-उतार लक्षात घेऊन पाऊल टाका. सार्वजनिक क्षेत्रातील उत्साह टिकवून ठेवा. कुटुंबाला विश्वासात घेऊन तुमच्या कामाच्या नियोजनाची कल्पना द्या. वैवाहिक जोडीदाराच्या भावनेची कदर करा. योग्य वेळी उपचार घ्या. **महिलांना :** हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल, विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या कला क्षेत्रात अधिक वाव मिळेल. मानसिक संतुलन ठेवा, विचारपूर्वक कृती करा यामुळे फायदा झाला नाही तरी नुकसान होणार नाही. **शुभदिनांक :** १९,२२.

## खर्चावर नियंत्रण ठेवा



**कन्या :** राशीसाठी आपले ग्रहमान विस्कळीत घडीची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न असू द्या. ग्रहांची ताकद वाढवण्यासाठी कोणत्याही गोष्टीची शहानिशा केल्याशिवाय निर्णय घेऊ नका. विचारपूर्वक कृतीवर भर द्या. व्यावसायिकदृष्ट्या प्रयत्नवादी राहा. इतरांशी स्पर्धा करणे टाळा. व्यापार-उद्योगातील तांत्रिक अडचणी कमी होतील. नोकरदार व्यक्तींची दडपणाखालची परिस्थिती सुधारेल. सुटकेचा नि:श्वास घ्याल. धरसोड वृत्ती स्थिर होईल. तुमच्या हाती आलेले वेळापत्रक प्रथम तपासून घ्या. त्यानुसार कामाचे नियोजन ठरवा. पैशांचा अपव्यय टाळा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. सामाजिक क्षेत्रात मिळतेजुळते घ्यावे लागेल. कुटुंबातील व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या. मानसिक ताणतणाव कमी करा. धार्मिक कार्यासाठी तुमचा सहभाग महत्त्वाचा राहील. स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. **महिलाना :** तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याची ही शक्यता आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल कौटुंबिक वातावरण चांगले राहील. **शुभदिनांक :** १७,२३.

## थोरामोठ्यांची कृपा राहील



**तुळ :** राशीसाठी आपले ग्रहमान अवघड वाट सोपी करण्याचा तुमचा अट्टहास सिद्ध होईल. ग्रहांचे प्राबल्य उत्तम राहील. व्यावसायिकदृष्ट्या चालून आलेल्या सुवर्णसंधीचा वापर तुम्ही चांगला कराल. काही संस्थांशी केलेले करारमार्गी लागतील. मोठ्या कारखानदारी उद्योग व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना मिळेल. छोट्या स्वरूपातील काम आता हळूहळू मोठ्या स्वरूपात होऊ लागेल. कोलमडलेली व्यावसायिक जीवनशैली पुन्हा नव्याने उभी राहील. केलेले नियोजन यशस्वी ठरेल. नोकरीमध्ये ज्या पदासाठी तुम्ही उत्सुक आहात, ते तुमच्याकडे सोपवले जाईल. याचा आनंद तुमच्या चेहऱ्यावर दिसून येईल. आर्थिक निराशा कमी होईल. राजकीय क्षेत्रात तुमच्या बोलण्याचा प्रभाव राहील. या प्रभावाच्या जोरावर आपली बरीच कामे मार्गी लागणार आहेत. थोरामोठ्यांची कृपा राहील. खाण्यापिण्याचे पथ्यपाणी पाळा. आरोग्य जपा. **महिलाना :** महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. बाहेर फिरायला जाण्याचे स्वप्न यावेळी पूर्ण करू शकाल, मुलांन कडून खुश खबर मिळेल प्रकृती जपा. **शुभदिनांक :** १८,२१.

## कामाचे कौतुक होईल



**वृश्चिक :** राशीसाठी आपले या सप्ताहा आपली ग्रहस्थिती खूप सकारात्मक असल्याने होणारे चंद्राचे भ्रमण आपल्याला शुभदायक ठरेल. अडकलेली कामे आता वेगाने सुरू होतील. थोडक्यात लांबलेल्या गोष्टींना वेग येईल. शुभ घटनांचे संकेत मिळतील. आगामी काळासाठी उत्पन्नवाढीचे परिणाम चांगले राहतील. मोठ्या उद्योगधंद्यांना मिळणारी कलाटणी धीर देणारी असेल. देवाणघेवाण वाढल्यामुळे फायद्याचेही प्रमाण वाढलेले असेल. शासकीय कर्मचारी वर्गाला मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. ज्येष्ठांकडून तुमच्या कामाचे कौतुक होईल. आर्थिक प्रगती उत्तम राहील. राजकीय क्षेत्रात मानसन्मान मिळेल. मित्रांमार्फत मिळणारी संधी डावलू नका. ओळखीचा फायदा होईल. भाऊबंदकीचा त्रास कमी होईल. नव्या नात्यांमधील वाढ जीवनाला चांगले वळण देणारे ठरेल. वैवाहिकदृष्ट्या सुखद अनुभव मिळेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. आरोग्य उत्तम राहील. **महिलाना :** वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. **शुभदिनांक :** १९,२०.

## द्विधा मन:स्थिती टाळा



**धनु :** राशीसाठी या सप्ताहात अशुभ गोष्टींचे परिणाम कमी झालेले जाणवू लागतील. वर्तमान परिस्थितीचा अंदाज घ्या. त्यानुसार नियमावली ठरवा. खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील नेहमीची सवय बदलावी लागेल. व्यापार-उद्योगाच्या दृष्टीने रोखीच्या व्यवहाराला महत्त्व द्या. दक्षतापूर्वक घेतलेली काळजी हिताची ठरेल. कामाच्या ठिकाणी ठरवलेले नियम स्वीकारून पुढे चला. आक्रमक भूमिका घेऊ नका. शक्य तेवढे कामाकडे लक्ष द्या. द्विधा मन:स्थिती टाळा. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. आर्थिक बाबतीत जेवढ्यास तेवढे राहा. नेहमीपेक्षा खर्चाचे प्रमाण कमी करा. राजकीय धुरा सांभाळताना नाकीनऊ येणार नाही, याची सुरक्षितता बाळगा. स्वत: न पाहिलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका. घरगुती वातावरणातील पेच हळुवारपणे सांभाळा. धार्मिक गोष्टीतील प्रसन्नता वाढेल. खाण्यातील अभिरुची वाढलेली असेल. प्रकृती साथ देईल. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल त्यांच्यामुळे आपला मोठा लाभ संभवतो. **शुभदिनांक :** २१,२३.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा



**मकर :** राशीसाठी या सप्ताहात आपण अखेर अडथळ्यांची शर्यत शेवटी पार केली असेच म्हणावे लागेल. आपल्या राशीला उत्तुंग भरारी मिळवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होण्याच्या मार्ग समोर दिसणार आहे. मात्र, हुरळून जाऊन काम विघडवू नका. सध्या ग्रहयोगाची अनुकूलता वाढलेली असेल. व्यापारातील जाणकार व्यक्तींकडून मार्गदर्शन घ्या. हाती घेतलेल्या कामाचे नियोजन निश्चित करा. निरंतर परिश्रमाचे ठसे उमटू लागतील. व्यवहारात फसगत होऊ देऊ नका. सेवक वर्गाने व्यक्तिश: केलेल्या कामाचे स्वरूप हाताळताना काळजी घ्यावी. स्वतंत्र विचारप्रणाली सध्या बाजूला ठेवा. अधिकारी व्यक्तींनी ठरवून दिलेले नियम मोडू नका. पैशांच्या बाबतीत उधळण करणे टाळा. सामाजिक माध्यमांचा चुकीच्या कामासाठी उपयोग करू नका. मित्रांना वैयक्तीक गोष्टीत हस्तक्षेप करू देऊ नका. अविवाहितांचा विवाह प्रश्न सुटेल. प्रकृती उत्तम राहील. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. **शुभ दिनांक :** १८,२०.

## महत्त्वाच्या गोष्टींना प्राधान्य द्या



**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहात अनावश्यक कामे टाळणे उत्तम राहील या आठवड्याची सुरुवात थोडी कंटाळवाणी वाटेल. त्यानंतर मात्र आळस झटकून कामाला लागाल. मागील काही दिवसांपासून इच्छा असूनसुद्धा प्रगतीची झेप उंचावत नव्हती. आता मात्र ती परिस्थिती बदलेल. व्यापार-उद्योगाच्या ठिकाणी व्यवहार सुरळीत पार पडतील. नवे काही प्रकल्प हाती येतील. नोकरदार व्यक्तींनी मानसिकदृष्ट्या हतबल न होता कामात लक्ष घाला. इतरांच्या बोलण्याचा विचार न करता अनावश्यक गोष्टी टाळा. महत्त्वाच्या गोष्टींना प्राधान्य द्या. खर्चाची बाजू सावरली तर पैशांची कमतरता जाणवणार नाही. हातात पैसा येत राहील, खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी नेहमी प्रमाणाचा हातखंडा राहील. **महिलांना :** कुटुंबातील व्यक्तींकडून शाबासकीची थाप मिळेल. धार्मिक गोष्टींची आवड निर्माण होईल. शारीरिकदृष्ट्या होणारी धावपळ कमी करा. आराम करा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. प्रकृती जपा. आर्थिक बाजू ठीक राहील. तरीही मागेल त्याला पैसे देऊ नका लवकरच घरात चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक :** २१,२२.

## घरात आनंदी वातावरण राहील



**मीन :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या राशीला ग्रहाचे पाठबळ उत्तम राहील. आपल्या मनात घोळत असलेला संभ्रम कमी होईल. या आठवड्यात बऱ्यापैकी अनुकूलता राहील. सुधारित घटनांना वेग येईल. व्यवसायात आश्चर्यकारक बदल होतील. अनेक धोरणे पार पडतील. केलेल्या गुंतवणुकीचा लाभ चांगला होईल. आतापर्यंत नोकरीवर मिळालेली सुट्टी भरून काढावी लागेल. कामाचे तास वाढवावे लागतील. संशोधन कार्यात सहभागी व्हाल. बौद्धिक यश मिळेल. आर्थिक बाबतीत तत्पर राहा. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नका. सार्वजनिक गोष्टीतील हालचालींकडे लक्ष द्या. मात्र, ज्येष्ठ व्यक्तींना दुखावून चालणार नाही. त्यामुळे त्यांच्या बरोबर गोडी वाढवण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** एकंदरीत आपल्या नात्यातील गोडवा वाढल्याने घरात आनंदी वातावरण राहील. अविवाहितांचे मनाप्रमाणे विवाह ठरतील काही इच्छुकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्यांनी लॉटरी काढण्यास हरकत नाही खूप वर्षापासून रखडलेले विवाह प्रयत्न केल्यास ठरतील. दैव अनुकूल राहील. तब्येतीत सुधारणा होतील. विचारांचे समीकरण जुळू शकेल. **शुभ दिनांक :** १७,२३.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटिस

सर्वसामान्य जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, माझे ग्राहक खाली नमूद केलेली अनुसूचित मालमत्ता (शेती जमीन) खरेदी करण्याचा मानस बाळगून असून सदर विक्री व्यवहाराच्या अटी व शर्तीबाबत माझे ग्राहक श्री. आसिम नूरअली मर्चंट, रेहान आसिम मर्चंट, फिरदौस नूरअली मर्चंट आणि शिफा फिरदौस मर्चंट यांच्यात तसेच गाव नमुना सातामध्ये नोंद असलेल्या विद्यमान मालकांमध्ये, गट क्रमांक/उपविभाग २८२, मौजे कामत, ता. अलिबाग, जि. रायगड या मालमत्तेबाबत चर्चा सुरू आहे.

सदर विक्री-खरेदी व्यवहारास कोणाचा काही आक्षेप, दावा, हक्क किंवा वाद असल्यास त्यांनी त्यासंबंधीचे कागदोपत्री पुरावे सादर करून या जाहिरातीच्या प्रसिद्धीपासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा, माझे ग्राहक सदर अनुसूचित मालमत्तेचा विक्री-खरेदी व्यवहार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दावा/आक्षेप/वादाशिवाय पूर्ण करतील आणि त्यानंतर कोणताही दावा किंवा आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

**अनुसूचित मालमत्तेचे विवरण**

मौजे कामत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग २८२ मधील सर्व भाग व तुकडे असलेली शेती जमीन, क्षेत्रफळ ०-४४-६० हे.आर., पोटखराब क्षेत्र ०-३-८० हे.आर., एकूण क्षेत्र ०-४८-४० हे.आर., आकारणी रु. ११.००.

**सही/- ॲड. योगेश राणे**

कार्यालयाचा पत्ता : ऑफिस नं. ४४, अपर ग्राउंड फ्लोअर, खटाव बिल्डिंग, शहीद भगतसिंग रोड, रस्टिको हॉटेलजवळ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. संपर्क क्रमांक : ९९२०९०६४८६
ई-मेल : raneyogesh33@gmail.com
मुंबई
दिनांक : १५/०५/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमिन मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. तुकाराम गणपत आंबेतकर, सौ. लिला गणपत आंबेतकर व श्री. महेंद्र गणपत आंबेतकर यांचेकडून कायमस्वरुपी विकसित करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकती हया पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर बिनशेती जमिन मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र - (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि.रायगड | ८/ब/३ | ३-०६-०० | ३०.६० |
| | ८/ब/४ | २-९३-०० | २९.३० |

अलिबाग,
दि. १६/०५/२०२६

**Adv. Mahesh Suhas Mhatre**
B.A. LL.B. (MAH/5773/2006)
Public Notary
Office: Ruturaj Plaza, Flat No. 1,
Ground Floor, Shivaji Chowk,
Near Gawade Optics, Alibag,
Raigad 402 201.
Contact No.: 09850042234/7741032234
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे महाळुंगे खुर्द, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक शहनाज कमरुद्दिन हलडे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे महाळुंगे खुर्द, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| महाळुंगे खुर्द ता.मुरुड | ६२ | १-१२-०० पो.ख. ०-१७-०० एकूण क्षेत्र १-२९-०० | १.५५/- |

वर नमुद मिळकतीमधील शहनाज कमरुद्दिन हलडे यांच्या मालकीचे खाते क्र. ९८ क्षेत्र ०-७४-०० हे.आर., पो.ख. ०-१५-०० हे.आर., एकुण क्षेत्र ०-८९-०० हे.आर., आकार १.०२/- रु. पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-०० हे.आर. इतक्या क्षेत्राबाबत.

दिनांक : १७/०५/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे आमचे अशिल यांनी विद्यमान मालक मोहन वामन जुवळे, यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बोबडघर ता.रोहा | १३/२ | ०-२०-०० | १.१४ |
| बिरवाडी ता.रोहा | १९ | ०-२०-८० | २.५६ |

दिनांक : १७/०५/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट अलिबाग-रायगड
जे.एस.एम कॉलेज जवळ,
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे निगडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथीन खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक पार्वती जानू आग्री (पूर्वश्रमीच्या हिराबाई पांडू आग्री) यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| निगडे | ३१/२ | ०-०३-०० ०-६०-७० ०-६३-६० पो. ख. ०-०१-८० ०-६५-५० | १०.२५ |

पैकी दक्षिणेकडील ० हे.३९.३० आर एवढी मिळकत.
सदर ० हे. ३९.३० आर मिळकतीस चतुः सिमा :
पुर्वस : मौजे निगडे स. नं. ५२ या मिळकतीची हद्द व फॉरेस्ट,
पश्चिमेस : मौजे निगडे स. नं. ५१ या मिळकतीची हद्द.
दक्षिणेस : फॉरेस्ट,
उत्तरेस : मौजे निगडे स.नं. ३१/२ या मिळकतीपैकी उर्वरित भाग,

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, निज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, कुळवहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : १७/५/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकां कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे- दहिगाव, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. तानाजी दगडू मालूसरे | २४ | १/अ/१ | ०.३०.०० | ०.५० |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १७/०५/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.नवनाथ गणू ठोंबरे**
पत्ता. कोल्हीवली, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८००७३२७९७९

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नितीन सूर्यकांत म्हात्रे, यांचेकडून कायमस्वरुपी विकसित करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर बिनशेती जमिन मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड | १८/२/२ | ४-२८-०० | ४२.८० |

अलिबाग,
दि. १६/०५/२०२६

**Adv. Mahesh Suhas Mhatre**
B.A. LL.B. (MAH/5773/2006)
Public Notary
Office: Ruturaj Plaza, Flat No. 1,
Ground Floor, Shivaji Chowk,
Near Gawade Optics, Alibag,
Raigad 402 201.
Contact No.: 09850042234/7741032234
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक सौ.संपदा संदीप पाटील, रा.लेबर कॉलनी रोड, तुडाळ, पो. नवेदर नवगाव, ता.अलिबाग-रायगड व सौ. सायली संतोष घरत, रा. गुरव आळी, झिराड, पो. झिराड, ता.अलिबाग-रायगड यांनी त्यांचा असलेला खालील भातशेती मिळकती मधील अविभक्त हिस्सा त्यांचे सहहिश्शेदार यांचे संमतीने माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबतचा तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| थळ ता.अलिबाग | ७५/४/२ | ०.१९.०० पो.ख. ०.०१.०० एकूण ०.२०.०० | ४.८२ |

वर नमुद भातशेती मिळकतीमधील विद्यमान मालक सौ. संपदा संदीप पाटील व सौ. सायली संतोष घरत यांचा असलेला अविभक्त हिस्सा त्याचे क्षेत्र ०.०८.०० हे.आर. भातशेती मिळकतीपैकी क्षेत्र ०.०६.०० हे. आर. भातशेती मिळकत.

सबब सदर भातशेती मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबाकब्जा, इजमेंट, साठेकारार, गहाण, दान, बोजा वा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांची या नोटिशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरव्यांसह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिष्टर पोष्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येण्याच्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक १६/०५/२०२६

सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
रा.दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वावे, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. नित्यानंद गजानन म्हात्रे व गणेश गजानन म्हात्रे यांनी खाली नमूद केलेल्या सदर ७/१२ सदरी हक्कसोडपत्र लिहून देणार वैशाली यशवंत पाटील, ऋषिकेश यशवंत पाटील, रूपेश यशवंत पाटील, रोहन यशवंत पाटील, पार्वती गंगाराम पेढवी, करिश्मा प्रतिक म्हात्रे यांचा असलेला अविभक्त संपूर्ण हिस्सा यांच्याकडून रजिस्टर हक्कसोडपत्राने पूर्ण मोबदला देऊन घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| वावे | ३८/३/१ | ०.२०.९० पो.ख. ०.०२.२० एकूण क्षेत्र ०.२३.१० | ३.३३ |

तरी वर नमूद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि. १७/०५/२०२६

सही/-
**ॲड हेमा.ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो.नं. ९८२२०३०३८९

प्रोसेस जमा
दि.

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज नं. ४५/२०२६

## जाहीर नोटीस

श्री. अनिल श्रीनीवासराव कारखाणीस
वय - ६१ वर्षे, धंदा नोकरी, — अर्जदार
रा. रेवस रोड, मु. आगरसुरे,
पो. चोंढी, ता.अलिबाग, जि. रायगड
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ व २ यांचा मुलगा कै. हर्ष अनिल कारखाणीस हा दिनांक दि. २०/०७/२०२५ रोजी मयत झाला असून त्यांस अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारस आहेत.

कै. हर्ष अनिल कारखाणीस यांचे नांवे असलेली यमाहा एफ. झेड ही पेट्रोल दुचाकी गाडी यमाहा एफ. झेड, दुचाकी गाडी नं. MH-06/CK-7130 चासिस नं. : ME1RG66K29001925, इंजिन नं. : G3N3E0266672, टाईप बॉडी :-Solo with Pillion, कलर :-BLACK METTALICX ही दुचाकी गाडी अर्जदार नं. १ यांचे नांवे होणे करिता त्यांनी वारस दाखला मिळावा म्हणून या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना कै. हर्ष अनिल कारखाणीस यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि. १५/०६/२०२६ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार नं. १ व २ यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. हर्ष अनिल कारखाणीस यांचे वारस म्हणून वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकूम अर्जदार नं. १ व २ यांचे लाभात करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. ०८ माहे मे २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| सही/- | सही/- |
|---|---|
| **लिपिक** | **अधिक्षक** |
| **दिवाणी न्यायालय** | **दिवाणी न्यायालय** |
| **व. स्तर अलिबाग** | **व. स्तर अलिबाग** |

# एमजीएम हॉस्पिटलसमोरील अतिक्रमणे जमीनदोस्त



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्पाअंतर्गत मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरळीत करण्यासाठी पनवेल महापालिका आणि सिडको प्राधिकरण यांनी संयुक्त कारवाई करत एमजीएम हॉस्पिटलसमोरील अतिक्रमणे जमीनदोस्त केली. मंगळवारी राबविण्यात आलेल्या या मोठ्या कारवाईमुळे दीर्घकाळ अडथळा ठरत असलेला रस्ता अखेर मोकळा झाला असून, परिसराने सुटकेचा श्वास घेतला आहे. एमजीएम हॉस्पिटलसमोरील कॉरिडॉर वाहतुकीसाठी उपलब्ध करून देणे हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. अनेक वर्षांपासून उभारण्यात आलेली पक्की अतिक्रमणे जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली. या भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ही कारवाई महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. या संयुक्त मोहिमेत पनवेल महापालिका, सिडको प्रशासन तसेच पोलीस दलाचे मोठे मनुष्यबळ तैनात करण्यात आले होते. कारवाई दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. महापालिका आयुक्त मंगेश चितळे आणि अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. या वेळी सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने, अधीक्षक दशरथ भंडारी, उमेश मडवी, सिडकोचे अधिकारी रावसाहेब देवकर तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोपरगांव

विश्वास + सुरक्षितता = समता

स्व.यशवंतराव चव्हाण,समता सहकार मार्ग,खंदकनाला,कोपरगांव-४२३६०१
ता.कोपरगांव,जि.अहिल्यानगर,(०२४२३)२२५५५७/५८

## संस्थेच्या नावे हस्तांतरीत झालेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

ज्याअर्थी **समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,कोपरगांव,ता.कोपरगांव,जि.अहिल्यानगर** यांनी खाली नमुद केलेल्या कर्जदार/थकबाकीदारांविरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळवून थकीत रक्कमेचा भरणा न केल्यामुळे संस्थेने मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, **अलिबाग रायगड** यांचेकडेस प्रस्ताव दाखल करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०० नियम ८५ अन्वये मालमत्ता हस्तांतरीत प्रमाणपत्र (**"र"प्रमाणपत्र**) मिळवून सदर तारण मिळकत संस्थेच्या नावे हस्तांतरीत केलेली आहे व मालकी,भोगवटादार सदरी संस्थेच्या नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकत विक्री करण्याचा संस्थेस अधिकार आहे. त्याअर्थी संस्थेने स्थावर मिळकतीची जाहीर विक्री करून थकीत रकमेचा वसुल करण्याचा निर्णय घेतला आहे.

**कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव**

**कर्जदार - श्री.किशोर ओटरमल जैन.,**
**रा.**१७१६/०१,अंजुपार्क बाजारपेठ,मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६
**यांचे जामीनदार :-**
**१)श्री.किरण अमृतलाल जैन.,रा.**आर्ची किराणा बाजारपेठ,मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६
**२)श्री.दिनेश मिश्रीलाल परमार.,रा.**जैन एजन्सी बाजारपेठ,मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६
**३)श्री.असलम रमजान शेख.,रा.**मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६

**संस्थेच्या नावावर हस्तांतरण झालेल्या मिळकतीचे वर्णन**

मौजे उसाळे,ता.सुधागड,जिल्हा रायगड येथील समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या.कोपरगाव यांची मिळकत.

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१ | ५.५१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१५ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२९ | २.०७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४३ | १.७० |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/२ | १.६३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१६ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३० | १.८० | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४४ | १.६९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/३ | १.९२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१७ | १.७० | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३१ | १.६८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४५ | १.६९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/४ | १.८६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१८ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३२ | २.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४६ | १.६९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/५ | १.७८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१९ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३३ | २.४५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४७ | २.३९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/६ | १.८५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२० | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३४ | २.१० | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४८ | २.०० |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/७ | २.२६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२१ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३५ | १.४९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४९ | ३.६६ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/८ | १.५४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२२ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३६ | १.४२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५० | २.४४ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/९ | १.७४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२३ | १.९७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३७ | ३.१२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५१ | ४.२९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१० | १.७२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२४ | २.३७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३८ | २.४६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५२ | ५.८५ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/११ | १.५७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२५ | १.७८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३९ | २.३४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५३ | १.९३ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१२ | १.४२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२६ | १.७४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४० | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५४ | २.०४ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१३ | १.७९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२७ | १.७३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४१ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५५ | ४.९६ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१४ | २.१५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२८ | १.९७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४२ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/खुली जागा | २४.७५ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/ सुविधाजन्य क्षेत्र | १२.०५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/ बांधकाम रहित क्षेत्र | २.२९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/अंतर्गत रस्ता | ८२.४८ | | |

**जाहिर विक्रीत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी नमूद ठिकाणी तारखेस व वेळेत उपस्थित रहावे.**

१) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास जाहीर विक्री रद्द करण्यात येईल.
२) जाहीर विक्रीच्या अटी व शर्ती विक्रीच्या वेळी वाचून दाखविणेत येतील.
३) विक्री तहकूब अथवा रद्द करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.
४) लिलावात भाग घेणेसाठी रु.२५,०००/- (पंचवीस हजार मात्र)अनामत भरावी लागेल.

वार **गुरुवार,दि.१८/०६/२०२६** रोजी,
वेळ **दु.०३.००** वाजता.
**ठिकाण :-** स्थावर मिळकतीच्या ठिकाणी
मौजे उसाळे,ता.सुधागड,जि.रायगड येथे

**जे.एस.कदम**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,कोपरगांव
मो.नं.९३७१३३३५५६




## राशीभविष्य

- **मेष** : अडचणींवर मात करू शकाल. स्थावर प्रश्नात लाभ होईल. अभियांत्रिकी क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : कर्तृत्त्वाला आणखी वाव मिळेल. नव्या संधींचा लाभ घ्यावा. कामासाठी प्रवास फायदेशीर ठरेल.
- **मिथुन** : अनपेक्षित दिलासा मिळेल. अचानक अधिक खर्च करावा लागेल. अनुभवींचं मार्गदर्शन घ्यावं.
- **कर्क** : प्रापंचिक प्रश्न हैराण करतील. अवाका पाहून जबाबदाऱ्या घ्याव्या. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **सिंह** : कामासाठी बरीच धावपळ होईल. डोळ्यांचे विकार संभवतात. शिक्षण क्षेत्रात संधी चालून येतील.
- **कन्या** : गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. वरिष्ठांशी मतभेद टाळावे. मुलांची उत्तम प्रगती होईल.
- **तूळ** : व्यवसायात चिंता निर्माण होईल. विवाहाची बोलणी लांबणीवर पडतील. थोरांचा सहवास लाभेल.
- **वृश्चिक** : चैनीवर अधिक खर्च होईल. कलाकारांना मानसन्मान लाभेल. मित्र-नातलगांचं सहकार्य मिळेल.
- **धनु** : मोठी खरेदी पार पडेल. कौटुंबिक सौख्य लाभेल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात उत्कर्ष साधता येईल.
- **मकर** : मनाजोग्या घटना घडतील. निराशा, औदासिन्य दूर होईल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल.
- **कुंभ** : उत्साहाने कार्यरत रहाल. स्वकर्तृत्त्वावर यशाचे नवे टप्पे पार कराल. भावंडांशी मतभेद टाळावेत.
- **मीन** : भागीदारी व्यवसायात विचारानं रहावं. उपजत कलांना चांगला वाव मिळेल.

ब्युटी टॉक

## देशोदेशीची ब्युटी सीक्रेट्स

चेहऱ्याचं सौंदर्य खुलवण्यासाठी विविध नैसर्गिक घटक आजमावले जातात. देशोदेशीच्या महिलांच्या सौंदर्याची काही गुपितं आपण जाणून घेऊ या. हे उपाय ट्राय करायला काहीच हरकत नाही.

* पुराण काळातल्या ग्रीक देवता सौंदर्य खुलवण्यासाठी ऑलिव्ह ऑईलचा वापर करायच्या. म्हणूनच या देशातल्या महिलाही त्वचेला ऑलिव्ह ऑईलचं पोषण देतात. अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वांनी समृद्ध असं ऑलिव्ह ऑईल त्वचेला तजेला देतं. याच्या नियमित वापरामुळे चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी होतात तसंच सूर्यकिरणांमुळे होणारं नुकसान टाळता येतं.

* शेजारी चीनमधल्या महिला चेहऱ्याच्या देखभालीसाठी तांदूळ भिजवलेलं पाणी वापरतात. या पाण्याचा वापर चेहरा स्वच्छ करण्यासाठी केला जातो. या पाण्यात अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे त्वचेचं पोषण होतं तसंच फ्री रॅडिकल्सची तीव्रता कमी होऊन त्वचा तजेलदार दिसते. तांदूळ पाण्यात अर्धा तास भिजवून ठेवा. पाणी गाळून घ्या आता या पाण्याने चेहरा धुवून घ्या. (क्रमश:)

## १७ मे

दिनविशेष

- **१९७२** : प्रख्यात शिल्पकार रघुनाथ कृष्ण फडके यांचं निधन.
- **२०१३** : स्पॉट फिक्सिंग प्रकरणी एस. श्रीशांत आणि अंकित चव्हाण यांनी कृत्याची कबुली दिली.
- **२०१७** : देशात दहा स्वदेशी अणुभट्ट्या उभारण्यात येणार असल्याचं जाहीर.
- **२०१८** : कर्नाटकमध्ये भाजपाने सत्तेचा घास हिरावून घेतल्यानंतर काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाने न्यायालयाचं दार ठोठावलं.

स्मार्ट टॉक

## मिळवा बेबी फेस

छोट्यांनो, आता तुम्ही कोणत्याही फोटोचं रुपांतर बेबी फोटोमध्ये करू शकता. म्हणजे फोटोतला चेहरा लहान बाळांसारखा दिसायला लागेल. हे फिल्टर वापरण्यासाठी तुम्हाला स्नॅपचॅट ॲप डाउनलोड करावं लागेल. सोशल नेटवर्किंग ॲप स्नॅपचॅटने 'बेबी फिल्टर' हे फीचर आहे. हे फीचर चेहरा ओळखून फोटो क्लिक केल्यानंतर चेहऱ्याचा लूकच बदलून टाकतं. तुमचा चेहरा लहान बाळासारखा दिसू लागतो. फक्त दोन ते तीन सेकंदांमध्ये सगळी प्रक्रिया पूर्ण होते. विशेष म्हणजे तुमच्याकडे मित्रमैत्रिणींचा फोटो असेल तर तरी त्यांचे चेहरे तुम्ही बदलू शकता. हे फिल्टर वापरण्यासाठी स्नॅपचॅट ॲप इन्स्टॉल करून घ्या. लॉग इन करा. आता रिअर किंवा फ्रंट यापैकी एका कॅमेऱ्याची निवड करा. खालच्या बाजूला तुम्हाला स्मायली आयकॉन दिसेल. त्यावर क्लिक करून बेबी फिल्टर सिलेक्ट करा. त्यावर क्लिक केल्यानंतर तुमचा चेहरा लहान बाळांसारखा दिसू लागेल. मग काय दोस्तांनो आहे ना हे धम्माल फिल्टर. या लूकमधले फोटो तुम्ही शेअरही करू शकता. डीपी किंवा प्रोफाइल पिक्चर म्हणूनही त्यांचा वापर करता येईल.

### पंचांग

**रविवार, १७ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ शु. १, चंद्रराशी : वृषभ,
नक्षत्र : कृतिका, योग : शोभन/अतिगंड,
सूर्योदय ६.०६, सूर्यास्त ७.०५

### फॉरवर्ड्स

**आज़ाद रिश्तों में लोग़ बंधन ढूंढ रहें हैं...**

**औऱ बंधे रिश्तों में आज़ादी...!**

आरोग्यमंत्र

## आयुष्य किती आहे?

प्रत्येकाला जीवनाची आसक्ती असते. आपलं आयुष्य किती असेल, याविषयी सगळ्यांनाच उत्सुकता असते. मग ती भागवण्यासाठी काही माणसे ज्योतिषाकडे जातात. आपल्या हातावरची आयुष्यरेषा किती लांब आहेत हे पाहतात. खरं पाहता कोण किती जगणार, कोणाचं आयुष्यमान किती याची शाश्वती कुणीही देऊ शकत नाही. पण एका रक्ततपासणीद्वारे माणूस किती वर्षं जगणार हे कळू शकतं. अर्थातच हे वाचून कुणालाही आश्चर्यच वाटेल. पण वैद्यकीय प्रगतीमुळे साध्य होऊ घातलेली ही महत्त्वपूर्ण बाब आहे. बोस्टन विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी रक्ततपासणीद्वारे



आयुष्यमान सांगता येत असल्याचा दावा केला आहे. रक्ततपासणीच्या या पद्धतीचा शोध लावल्याचं त्यांचं म्हणणं आहे. हा दावा खरा असेल तर वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने ही खूप मोठी बाब असेल.

मध्यंतरी एका वैद्यकीय जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं तेव्हा चर्चेला तोंड फुटलं. या संशोधनासाठी विविध रक्तनमुन्यांचा बायोमार्कर डाटा जमवण्यात आला होता. या रक्ताची तपासणी करण्यात आली. रक्तदात्यांच्या गेल्या आठ वर्षांतील आरोग्याची, त्यांच्या शरीरात झालेल्या बदलांची माहिती घेऊन आयुर्मानासंबंधीचे निष्कर्ष काढण्यात आले. यातून त्यांनी अनेक गोष्टी शोधल्या आहेत. चांगलं आणि वाईट असं दोन्ही प्रकारचं भवितव्य या संशोधनातून कळू शकतं, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

### करीअर ग्रोथ

तुम्हाला निसर्गाप्रती प्रेम असेल, जंगलं, प्राणी, पक्षी, किटक यांमध्ये रमायला आवडत असेल तर निसर्ग तज्ज्ञ म्हणून काम करता येईल.

आपल्या देशात अनेक अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानं आहेत. इथे गेल्यावर प्राणी, पक्षी दुरून बघण्यापेक्षा त्यांची योग्य ती माहिती मिळाली तर भटकंतीचा अनुभव अनेक अर्थांनी समृद्ध होत जातो. जंगलांमधल्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. एखाद्या पक्षाचा आवाज काहीतरी संदेश देत असतो. हरणांचं ओरडणं वाघ येत असल्याची वर्दी असू शकते. निसर्ग तज्ज्ञांना या सर्वांचं ज्ञान असतं. (क्रमश:)

करिअरवाटा

## महत्त्व व्यक्तिमत्त्व विकासाचे

शिक्षण पूर्ण होताच नोकरीचे वेध लागतात. या वयात शिक्षण, पदवी, प्रमाणपत्र, इंटरव्ह्यू, नोकरी आणि लठ्ठ पगार असं स्वप्न पडणं स्वाभाविक आहे. परंतु स्वप्न सत्यात उतरण्यासाठी करिअर प्लॅन करावं लागतं. एखादा अभ्यासक्रम निवडणं आणि तो पूर्ण करणं



म्हणजे प्लॅनिंग नव्हे. नोकरी मिळवणं म्हणजे एक प्रकारे स्वत:चं मार्केटिंग असतं. हे मार्केटिंग चांगलं करू शकतो तो उत्तम नोकरी करू शकतो. त्यासाठी स्वत:चं मार्केटिंग कसं करावं याचं शिक्षण घेण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षणाचा विचार गरजेचा ठरतो. यात मुख्यत्वे छान कसं जगावं, हेही जाणून घ्यायला हवं. व्यक्तिमत्वाच्या विकसनाचं प्रशिक्षणही गरजेचं आहे. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना तीन अंगाने विचार करता येतो. त्यातील पहिलं तंत्र म्हणजे एखाद्या व्यवसायाचं शिक्षण घेणं. दुसरं तंत्र त्या क्षेत्रातील किंवा आपल्या आवडीच्या विषयातील तज्ज्ञ होणं आणि तिसरं तंत्र त्या क्षेत्रात स्वत:चा ब्रॅन्ड निर्माण करणं. तुम्ही स्वत:ला ओळखणं आणि ओळखल्यानंतर उत्तम संवाद कौशल्याच्या आधारे लोकांसमोर स्वत:ला पेश करणं या गोष्टी करिअरमध्ये गरजेच्या असतात.

खेचाखेची

### धमक्या

**संता पोलीसला फोनवर** : हॅलो, पोलीस स्टेशन?
**पोलिस** : हं बोला काय झालं?
**संता** : मला फोनवर धमक्या येताहेत.
कोण धमक्या देतंय? कोण आहेत ते?
**संता** : मला टेलिफोनवाले धमकी देताहेत.
काय?
**संता** : मला म्हणताहेत की, बिल नही भरा तो काट देंगे.

### वेगळं काही

बिहारमधल्या पूर्णिया जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ३० किलोमीटर अंतरावर श्रीनगर प्रखंडाच्या सिंधिया पंचायतच्या हद्दीत एक गाव आहे. इथे संथाल आदिवासी राहतात. हे लोक हिंदूधर्मिय आहेत. हा भाग मुख्य शहरापासून बराच लांब आहे. इथल्या लोकांना धड हिंदीही बोलता येत नाही. मोलमजुरी करून ते उपजीविका चालवतात. या गावात सरकारी सोयी-सुविधा पोहोचलेल्या नाहीत. इथे शाळा आणि रुग्णालयासारख्या प्राथमिक सोयीही नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र गावापासून १२ किलोमीटर अंतरावर आहे. या गावाचं नाव पाकिस्तान का पडलं हे कोणालाच माहीत नाही. मात्र पूर्वी पाकिस्तानमधून आलेले लोक इथे रहात असत.

रुचिरा

## आंब्याची भन्नाट पाककृती

उन्हाळा आणि आंबा हे एक अतुट समीकरण आहे. या दिवसात आंबाशौकिनांची नुसती चंगळ असते. पण केवळ आंब्याचा रस आणि पोळी या डिशवर ताव मारु नका. आंब्याच्या विविध पाककृती तयार करुन चव चाखा. आता अशीच एक चविष्ट रेसिपी जाणून घेऊ या.



**साहित्य** - २५० ग्रॅम पनीर, एक वाटी आंब्याचा पल्प, आंबा इसेंन्स, वेलदोडे पावडर, दीड कप पाणी, पिस्ता आणि बदामाचे काप इत्यादी.

**कृती** - सर्वप्रथम पनीर मॅश करून त्यात आंब्याचा पल्प मिसळून घ्या. हे मिश्रण मळून छोटे-छोटे गोळे बनवून घ्या. पाक बनवण्यासाठी एका भांड्यात साखर आणि पाणी घ्या. तार सुटेपर्यंत ढवळत रहा. दहा ते पंधरा मिनिटांनी पाक तयार होईल. नंतर पाकात वेलदोडे पावडर टाका. त्यानंतर पनीर आणि मँगोचे गोळे पाकात अलगद सोडा. भांड्यावर झाकण लावून ठेवा. थोड्या वेळाने पनीरचे गोळे नरम झालेले दिसतील. गोळे नरम झाल्यानंतर आंब्याचा इसेंन्स टाका. बदाम-पिस्त्याच्या कापांनी गार्लिश करा.

## सुडोकू १०५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५ | ६ | | ४ | |
| ६ | | | ९ | | | ५ | | |
| ३ | ५ | ७ | | ४ | २ | | | ८ |
| | | २ | | | | ७ | | ६ |
| | | | | ६ | | | | |
| ७ | | १ | | | | ८ | | |
| ५ | | | २ | ७ | | ९ | ६ | १ |
| | | ४ | | | ५ | | | ३ |
| | २ | | ३ | ९ | | | | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १०४चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | २ | ७ | ४ | ५ | १ | ३ | ८ | ६ |
| ८ | ५ | ४ | ७ | ६ | ३ | ९ | १ | २ |
| १ | ३ | ६ | ९ | २ | ८ | ७ | ५ | ४ |
| ७ | ९ | २ | ३ | १ | ६ | ८ | ४ | ५ |
| ३ | १ | ५ | २ | ८ | ४ | ६ | ९ | ७ |
| ४ | ६ | ८ | ५ | ७ | ९ | १ | २ | ३ |
| २ | ४ | ३ | ८ | ९ | १ | ५ | ६ | १ |
| ६ | ७ | ९ | १ | ४ | ५ | २ | ३ | ८ |
| ५ | ८ | १ | ६ | ३ | २ | ४ | ७ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १०५



**आडवे शब्द :-**
१) हळकुंडाचे चूर्ण
३) न वापरलेली
५) ढीग
७) थांबून थांबून पडणारा पाऊस
१०) पाण्याचा उसळलेला तरंग
११) सरस-नीरस अशी भावना
१४) रत्न
१५) प्रवासातील अंतर,टप्पा
१८) वाहणारी हवा
१९) दावानल
२१) गळीत धान्यातील रस
२२) खूप खाली
२३) अमावस्या
२४) हाकेला दिलेली साद
२५) कमलबीज
२८) ब्राह्मण
२९) खोलवर नसलेले
३१) कणीदार तूप
३२) अलौकिक
३४) शिक्षक (इं)
३६) वाळवंट
३८) उणीव
४०) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था
४१) किरकोळ सामान
४४)गाव.शहर
४६) लबाडी,कारस्थान
४८) संरक्षक भिंत
४९) युद्धाची गाणी
५२) कापसाची बी
५४) मेदिनी, वसुंधरा
५७) मला
५८) शुभ्र,पांढरा
६०) मुसलमान
६१) कागदाचा ओला गोळा
६३) अनुमती
६५) मोठा भाऊ
६६) धपाटा
६७) मार्ग
६८) हिशेबाची एक बाजू
७०) भोजनशाळा,माजघर
७२) वर्ष
७४) निराश
७५) कणीदार पीठ
७७) न वापरलेला
७८) श्रीयुत
७९) लहान शहर
६०) छोटमोठा
८३) अंगरखा
८४) यमासारखा क्रूर, पाषाणहृदयी
८६) अनेकांचे एकदम रडणे
८७) एक बारीक धान्य
८८) पुष्कळ
८९) स्वत:बद्दल उल्लेख करण्याचा शब्द

**उभे शब्द :-**
१) विश्वासघातकी
२) अडत्या
४) प्रथा,पद्धत
५)रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
६) सारखा
७) सणांचा मराठी महिना
८) अखेरीस
९) अर्ध्या शेराचे माप
१२)जाडसर पीठ
१३) ज्याच्यावर भावनांचा परिणाम होतो असा
१६) पोहणे
१७) दक्ष
२०) सुकणावळ
२३) आईचे घर
२६) नूतन
२७) नाथपंथी गोसावी
२८) छोटी विश्रांती
३०) रचना करणारा
३३) पाठवणी
३५) द्रवपदार्थ
३६) समुद्र
३७) हिंदुस्थान
३९) मयूर
४१) मोठी उथळ पसरट वाटी
४२) भेग,चीर
४३) फळातील द्रव
४५) विधवा
४७) सं.ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
५०) माझा
५१) मोजकेपणा
५२) घनीष्ट संबंध, जवळीक
५३) बांबू
५५) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
५६) उत्कृष्ठ लाकडाची एक जात
५९) जंगलाचा राजा असलेला, सिंह
६२) घट्ट,घन
६४) श्रीविष्णूचे एक नाव
६५) कोर्टातील खटला
६९) मनाला आलेला थकवा
७१) वागणूक
७२) सरळ बांबू
७३) सम्राट
७६) हेलपाटा,यात्रेस,जाणे
७७) शुष्क,चाबूक आश्रय
७८) हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्त्राव
७९) होकारच्या विरुद्ध
८१) बाजार
८२) मोठा,महान
८३) खुंट आंचोळ
८५) व्यापारात झालेला फायदा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



**पाऊस कमी पडण्याचा अंदाज चिंताजनक ठरतो. अंदाज खरा ठरुन पाऊस कमी पडल्यास शेतकरी, सरकार, उद्योग आणि वित्तीय संस्था आदी घटक अडचणीत येतात. त्यामुळे या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी समन्वयित आणि दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहेत. योग्य नियोजन, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि तंत्रज्ञानाचा योग्य अवलंब यांद्वारे या संकटाचे परिणाम कमी करता येऊ शकतात.**

# कसा असेल यंदाचा मान्सून?

प्रा. अशोक ढगे

स्कायमेट आणि भारतीय हवामान विभागाचे येत्या पावसाळ्याविषयी जाहीर झालेले अंदाज बहुतांश सारखेच असून सामान्यपेक्षा कमी पाऊस पडणार आहे. त्याची तुलना लगेच २०१४-१५ च्या दुष्काळी वर्षांशी व्हायला लागली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन महिन्यांपासून कमी पावसाच्या अंदाजानुसार खरीप हंगामाचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यात खरिपाखालचे क्षेत्र पाच लाख हेक्टरने कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मे महिन्यात पावसाचा आणखी एक अंदाज येणार आहे. त्यातच पाऊस १५ दिवस अगोदर महाराष्ट्रात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. कमी काळात जास्त पाऊस झाला, तरी त्याचा उपयोग नसतो. कमी पावसाचा अंदाज व्यक्त झाला, की त्याचे पडसाद केवळ हवामानापुरते मर्यादित राहत नाहीत, तर थेट देशाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. भारतासारख्या कृषीप्रधान देशात मॉन्सून हा अर्थचक्राचा कणा मानला जातो. त्यामुळे मॉन्सून कमी होण्याची शक्यता व्यक्त होताच शेतकरी, धोरणकर्ते आणि रिझर्व्ह बँक यांच्यासह संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्यांच्या मनात चिंता निर्माण होते. भारतामध्ये सुमारे पन्नास टक्क्यांहून अधिक शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचा अंदाज कमी असल्यास सर्वप्रथम फटका बसतो, तो शेतकऱ्यांना. पेरणी उशिरा होते, काही ठिकाणी पेरणीच होत नाही, तर काही भागात उगवलेले पीक टिकवणे कठीण जाते. पाण्याअभावी उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर याचा थेट परिणाम होतो.

शेती उत्पादन कमी झाल्यास ग्रामीण भागातील खरेदीशक्ती घटते. ती संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची असते. ग्रामीण मागणी कमी झाली, की उद्योग, सेवा आणि इतर क्षेत्रांवरही परिणाम दिसून येतो. अडचणीच्या काळात ग्रामीण मागणीनेच अर्थव्यवस्था सावरली आहे, हे दिसून आले आहे. मान्सून कमी राहण्याचा दुसरा मोठा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर होतो. धान्य, डाळी, तेलबिया, ऊस यांसारख्या पिकांचे उत्पादन घटल्यास बाजारात पुरवठा कमी होतो. पुरवठा कमी आणि मागणी कायम असल्यामुळे किमती वाढतात. परिणामी महागाईला चालना मिळते. विशेषतः अन्नमहागाई वाढल्यास सर्वसामान्य नागरिकांवर परिणाम होतो. घरगुती बजेट बिघडते आणि खर्चाचे नियोजन बदलावे लागते. महागाई वाढल्यास रिझर्व्ह बँकेसारख्या केंद्रीय बँकेसमोर मोठे आव्हान उभे राहते. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी व्याजदर वाढवावे लागतात किंवा इतर कडक आर्थिक धोरणे अवलंबावी लागतात; मात्र व्याजदर वाढल्यास उद्योगांना कर्ज महाग होते. गुंतवणूक कमी होते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावू शकतो. त्यामुळे एका बाजूला महागाई नियंत्रित करणे आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक वाढ टिकवणे, हे संतुलन राखणे कठीण बनते. वित्तीय तूट नियंत्रणात राखण्याचा आणि महागाईचा परस्परांशी संबंध असल्याने त्याचा पावसाशीही संबंध येतो.



शासनकर्त्यांसाठीही ही परिस्थिती आव्हानात्मक असते. कमी पावसामुळे शेती संकटात आल्यास सरकारला शेतकऱ्यांसाठी मदत योजना जाहीर कराव्या लागतात. कर्जमाफी, अनुदान, पीकविमा भरपाई यांसारख्या उपाययोजना कराव्या लागतात. तसेच पाणीटंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, जलसंधारण प्रकल्प, सिंचन सुविधा यावर अतिरिक्त खर्च करावा लागतो. या सर्वामुळे सरकारचा महसूल ताणला जातो आणि वित्तीय तुटीवर दबाव वाढतो. कमी मॉन्सूनचा परिणाम आयात-निर्यात धोरणावरही होतो. देशांतर्गत उत्पादन कमी झाल्यास अन्नधान्य आणि इतर कृषी वस्तूंची आयात वाढवावी लागते. उदाहरणार्थ, डाळी, खाद्यतेल किंवा साखरेच्या बाबतीत उत्पादन घटल्यास आयातीवर अवलंबित्व वाढते. यामुळे परकीय चलनाचा खर्च वाढतो आणि व्यापार तूट वाढण्याची शक्यता निर्माण होते. दुसरीकडे, काही पिकांचे उत्पादन घटल्यामुळे निर्यात कमी करावी लागते किंवा त्यावर निर्बंध घालावे लागतात; जेणेकरून देशांतर्गत पुरवठा कायम राहील. याचा परिणाम जागतिक बाजारातील भारताच्या प्रतिमेवरही होऊ शकतो. ऊर्जा क्षेत्रावरही मॉन्सूनचा परिणाम होतो. जलविद्युत प्रकल्प पावसावर अवलंबून असल्याने पाणीसाठा कमी असल्यास वीजनिर्मिती घटते. परिणामी, इतर स्त्रोतांवर, विशेषतः कोळसा आणि गॅसवर अवलंबित्व वाढते. यामुळे ऊर्जा खर्च वाढतो आणि उद्योगांवर परिणाम होतो. तसेच पाणीटंचाईमुळे शहरांमध्येही पाणीपुरवठ्यावर ताण येतो. त्यामुळे नागरी जीवनावर परिणाम होतो.

पावसाविषयीचा अंदाज व्यक्त झाल्यानंतर नवी मुंबईसह राज्यातील अन्य शहरात पाण्याच्या वितरणात काही प्रमाणात कपात सुरू झाली. लातूरला मिरजहून पाणी दिल्याच्या आठवणी आणि कोपरगाव, मनमाडसारख्या शहरांमध्ये महिन्यातून एकदाच पाणी असे निर्णयही लगेच पुढे येतात. शहरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याला मर्यादा येतात. टँकर लॉबी कमी पावसाचा कसा फायदा घेते आणि त्यातून कसे आणि किती घोटाळे होतात, याबाबतच्या तक्रारी नवीन नाहीत. मॉन्सून कमी असल्यास ग्रामीण रोजगारावरही परिणाम होतो. शेतीतील कामे कमी झाल्यामुळे मजुरांना रोजगार मिळणे कठीण होते. यामुळे स्थलांतर वाढून शहरांवर ताण वाढतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे एकूण देशांतर्गत मागणी कमी होते. त्याचा परिणाम जीडीपीवाढीवर होऊ शकतो. याशिवाय, मानसशास्त्रीय परिणाम ही दुर्लक्षित करता येत नाही. शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता वाढते, कर्जाचा बोजा वाढतो आणि मानसिक तणाव निर्माण होतो. आत्मविश्वास कमी होतो, त्याचा परिणाम पुढील हंगामातील निर्णयांवर होऊ शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्राला लागलेला शाप आहे. कमी पाऊस, कमी उत्पादन आणि जगण्याच्या संघर्षातून वाढणाऱ्या आत्महत्या या चक्रातून महाराष्ट्राची सुटका व्हायला तयार नाही. त्याचे कारण पुन्हा पावसावरचे जास्त अवलंबित्व हेच आहे.

या पार्श्वभूमीवर सरकार आणि वित्तीय संस्था विविध उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतात. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांचे विविधीकरण, हवामान अंदाजाची अचूकता वाढवणे, तंत्रज्ञानाचा वापर यावर भर दिला जातो. तसेच शेतकऱ्यांना हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी प्रशिक्षण आणि आर्थिक मदत दिली जाते. दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहता, शेती अधिक टिकाऊ आणि कमी पावसावर अवलंबून राहणार नाही, हे बघणे ही काळाची गरज आहे. कमी पावसाचा अंदाज हा केवळ हवामानाचा मुद्दा नसतो, तर संपूर्ण आर्थिक व्यवस्थेच्या नसा हलवणारा संकेत ठरतो. मॉन्सून हा भारताच्या अर्थचक्राचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यातील थोडीशीही अनिश्चितता मोठे परिणाम घडवू शकते. त्यामुळेच कमी पावसाचा अंदाज जाहीर होताच शेतकऱ्यांपासून धोरणकर्त्यांपर्यंत आणि रिझर्व्ह बँकेसारख्या वित्तीय संस्थांपर्यंत सर्वांच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. या परिस्थितीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले असता मॉन्सून हा देशातील 'मूक आर्थिक निर्देशक' असल्याचे लक्षात येते. शेअर बाजार, चलनवाढ, व्याजदर, ग्राहकांची खरेदी क्षमता या सगळ्यांवर पावसाचा थेट किंवा अप्रत्यक्ष प्रभाव असतो. पावसाचा अंदाज कमी असल्यास सर्वप्रथम बाजारात एक प्रकारची सावध भूमिका दिसू लागते. गुंतवणूकदार काही प्रमाणात जोखीम टाळण्याचा प्रयत्न करतात, कारण ग्रामीण मागणी घटण्याची शक्यता निर्माण होते. ग्रामीण बाजारपेठेतील मंदीमुळे 'एफएमजीसी', ऑटोमोबाईल, बांधकाम यांसारख्या क्षेत्रांवर परिणाम होऊ शकतो.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाहिले, तर कमी पाऊस म्हणजे केवळ उत्पादनघट नाही, तर निर्णयप्रक्रियेत मोठा बदल असतो. कोणते पीक घ्यायचे, किती गुंतवणूक करायची, पाण्याचे व्यवस्थापन कसे करायचे या सगळ्या बाबी अनिश्चित होतात. अनेक शेतकरी जोखीम टाळण्यासाठी कमी खर्चिक पिकांकडे वळतात. त्यामुळे एकूण उत्पादन संरचना बदलते. याचा परिणाम पुढील काही महिन्यांमध्ये बाजारात होणाऱ्या उपलब्धतेवर आणि किमतींवर होतो. महागाईच्या दृष्टीने विचार केला असता कमी पावसाचा परिणाम केवळ अन्नधान्यापुरता मर्यादित राहत नाही.

अन्नमहागाई वाढली की त्याचा 'स्पिलओव्हर इफेक्ट' इतर क्षेत्रांवरही होतो. वाहतूक खर्च, उत्पादन खर्च, सेवा क्षेत्रातील किंमती यापैकी सगळीकडे वाढ दिसू शकते. त्यामुळे महागाई व्यापक स्वरूप धारण करते. शासनकर्त्यांसाठी हा काळ कसोटीचा असतो. एका बाजूला शेतकऱ्यांना मदत करणे, पाणी व्यवस्थापन सुधारणे, महागाई नियंत्रणात ठेवणे आणि दुसऱ्या बाजूला वित्तीय तूट वाढू न देणे ही अनेक स्तरांवरील जबाबदारी असते. कमी मॉन्सूनचा विचार व्यापक चौकटीत केला, तर हवामान बदलाच्या मोठ्या चित्राशी जोडलेला दिसतो. अनियमित पाऊस, दुष्काळाचे वाढते प्रमाण आणि बदलते हवामान ही भविष्यातील मोठी आर्थिक आव्हाने ठरणार आहेत. त्यामुळे केवळ एका हंगामापुरता विचार न करता दीर्घकालीन टिकावू विकासाचा विचार करणे अत्यावश्यक आहे. **

# 'वाटमार्गी'

धनंजय शेटये

'वाटमार्गी' नावातच एक गूढ, एक अदृश्य हालचाल, आणि गावकुसाच्या रक्षणाची एक अनाम शक्ती दडलेली आहे. आमच्या घरच्या अंगणातून, त्या मातीच्या खळ्यातून, एक वाट सरळ पुढे जात असे जणू काही ती केवळ माणसांचीच नव्हे, तर एखाद्या अदृश्य प्रवाशाचीही होती. लहानपणी आजी-आजोबा, आणि नंतर आई-वडील, एकाच सुरात सांगायचे'या वाटेने 'वाटमार्गी' जातो. त्यांच्या आवाजात भीती नव्हती, पण एक आदरयुक्त दडपण मात्र नक्कीच जाणवायचे.

मध्यरात्रीची ती कातरवेळ... सगळं गाव शांत झोपेत गुंग झालेलं असताना, कुठेतरी काठी जमिनीवर आपटल्याचा आवाज येतो, अशी कल्पना आमच्या मनात खोलवर रुजली होती. 'वाटमार्गी' हातात काठी घेऊन, आपला ठरलेला मार्ग चालत, गावाच्या सुरक्षिततेची राखण करत फिरतो असं आम्हाला सांगितलं जायचं. त्याच्या वाटेत कोणी अडथळा आणला, तर त्याला ''प्रसाद'' मिळतो, ही गोष्ट ऐकताना अंगावर काटा यायचा, पण त्याच वेळी त्या अदृश्य रक्षकाबद्दल एक वेगळीच कुतूहलभावना मनात निर्माण व्हायची.

उन्हाळ्याच्या सुट्ट्या म्हणजे आमच्यासाठी मोकळं आकाश, थंड वाऱ्याची चाहूल आणि अंगणात झोपण्याचा आनंद! उकाड्याने हैराण होऊन आम्ही सगळेच बाहेर झोपायचो, पण 'वाटमार्गी'साठी मात्र मुद्दाम एक वाट मोकळी ठेवायचो. त्या रिकाम्या जागेकडे पाहताना वाटायचं कदाचित आज तो दिसेल! अनेक रात्री मी जागून काढल्या, कान टवकारून प्रत्येक आवाज टिपायचा प्रयत्न केला; कधी काठी आपटल्यासारखा



आवाजही ऐकू यायचा. पण 'वाटमार्गी' कधीच डोळ्यांना दिसला नाही तो फक्त जाणवला.

आई-वडील सांगायचे 'वाटमार्गी म्हणजे देवचार एक अमूर्त शक्ती.' तो कोणालाही सहज दर्शन देत नाही; पण त्याची प्रचिती मात्र येते. हातात पेटती चूड, पायात अजब चपळता, आणि नजरेआड राहून गावभर फेरी मारणारा हा रक्षकही कल्पनाच किती विलक्षण! त्याच्या वाटेवर घाण करणं, अशुद्धता निर्माण करणं, हे मोठं अपराध मानलं जायचं. 'तो रागावतो,' असं ठामपणे सांगितलं जायचं. त्यामुळे गावातील पायवाटा स्वच्छ, मोकळ्या आणि आदराने जपल्या जात.

खरं तर, 'वाटमार्गी' ही संकल्पना अंधश्रद्धेच्या चौकटीत बसवता येईल; पण तिच्यामागचं सामाजिक भान अत्यंत सूक्ष्म आणि परिणामकारक आहे. रात्रीच्या वेळी चोरट्यांना रोखण्यासाठी, गावात भीतीचं एक अदृश्य जाळं निर्माण करण्यासाठी, आणि लोकांनी सार्वजनिक जागांचा आदर राखावा यासाठी ही कल्पना किती प्रभावीपणे रुजवली गेली होती! 'कोणी पाहत नाही' या भावनेला छेद देणारी, 'कोणी तरी आहे' ही जाणीव देणारी ही एक अप्रतिम लोकसंस्कृती होती.

आजच्या काळात प्रत्येकजण आपापल्या घराभोवती भिंती उभ्या करतो, कंपाऊंड बंद करतो, आणि जुने रस्ते, पायवाटा हळूहळू नाहीशा होतात. पण त्या काळी 'वाटमार्गी'च्या भीतीपोटी का होईना, त्या वाटा जपल्या गेल्या, खुल्या ठेवल्या गेल्या. कोणाचीही गैरसोय होऊ नये, गाव एकसंध राहावं, ही सामूहिक भावना त्या कथेमागे दडलेली होती.

काहीही म्हणा, 'वाटमार्गी' ही केवळ एक गोष्ट नव्हती ती होती गावाच्या सामाजिक शिस्तीची, स्वच्छतेची आणि सुरक्षिततेची एक सुंदर, मार्मिक आणि परिणामकारक संकल्पना. अदृश्य असला तरी त्याचा प्रभाव अत्यंत ठोस होता. आजही कधीकधी शांत रात्रीत कान देऊन ऐकलं, तर वाटतंकुठेतरी दूरवर काठी जमिनीवर आपटते आहे आणि 'वाटमार्गी' अजूनही आपली फेरी पूर्ण करत आहे. **

# विद्यार्थी समुपदेशन : पालक व शिक्षकांसाठी समग्र मार्गदर्शनपर विस्तृत लेख

सुनील गवळी

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण युगात विद्यार्थ्यांचे समुपदेशन ही केवळ पूरक गोष्ट नसून त्यांच्या सर्वांगीण विकासाची एक अत्यावश्यक प्रक्रिया बनली आहे. प्रत्येक विद्यार्थी हा वेगळ्या क्षमतेचा, वेगळ्या विचारांचा आणि वेगळ्या भावविश्वाचा असतो. त्यामुळे त्याचे मूल्यमापन केवळ गुण, टक्केवारी किंवा IQ (Intelligence Quotient) IQ च्या आधारावर करणे अपूर्ण ठरते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा अंदाज देतो, परंतु यशस्वी आयुष्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता, (EQ) सामाजिक कौशल्ये, सर्जनशीलता आणि सकारात्मक दृष्टीकोन हे घटक तितकेच महत्त्वाचे असतात.

शैक्षणिक क्षेत्रात च्या आधारे विद्यार्थ्यांचे काही प्रकार केले जातात. प्रतिभाशाली, सरासरी, मंद गतीचे आणि विशेष गरज असलेले विद्यार्थी. हे वर्गीकरण शिक्षकांना अध्यापन पद्धती ठरविण्यास मदत करते; परंतु याच वेळी विद्यार्थ्यांना ''हुशार'' किंवा ''कमजोर'' असे लेबल लावणे टाळणे आवश्यक आहे. कारण अशा शब्दांचा विद्यार्थ्यांच्या मनावर खोल परिणाम होतो आणि त्यांच्या आत्मविश्वासावर नकारात्मक प्रभाव पडतो. अनेक वेळा विद्यार्थ्यांची कामगिरी त्यांच्या बौद्धिक क्षमतेपेक्षा घरातील वातावरण, मानसिक ताण, भाषेची अडचण किंवा योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे कमी दिसून येते.

यामुळे समुपदेशन करताना बरोबरच विद्यार्थ्यांचा संपूर्ण संदर्भ लक्षात घेणे गरजेचे आहे. आजच्या आधुनिक शैक्षणिक दृष्टिकोनानुसार या संकल्पनेनुसार प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची बुद्धिमत्ता असते. काही विद्यार्थी अभ्यासात तर काही कला, क्रीडा, संगीत किंवा नेतृत्वात उत्कृष्ट असतात. या संकल्पनेनुसार प्रत्येक विद्यार्थी योग्य प्रयत्न आणि मार्गदर्शनाने प्रगती करू शकतो, हा विश्वास निर्माण करणे हे समुपदेशनाचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. घर हेच मुलांचे पहिले शाळा असते. पालकांनी मुलांची इतरांशी तुलना न करता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्वीकार केला पाहिजे. ''तू कमी आहेस'' असे सांगण्याऐवजी ''तू प्रयत्न करतो आहेस, अजून चांगले करू शकतोस'' असे प्रोत्साहन दिल्यास मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. गुणांपेक्षा प्रयत्नांचे कौतुक करणे ही सकारात्मक पालकत्वाची पहिली पायरी आहे. पालकांनी मुलांशी नियमित संवाद ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या भावना, त्यांच्या अडचणी, त्यांचे अनुभव समजून घेणे हेच खरे समुपदेशन आहे. अनेक वेळा मुलं अपयशामुळे खचतात; अशा वेळी त्यांना दोष देण्याऐवजी ''अपयश ही यशाची पायरी आहे'' हा विचार त्यांच्या मनात रुजवणे गरजेचे आहे. भावनिक आधार मिळाल्यास मुलं अधिक आत्मविश्वासाने पुढे जातात. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, टीव्ही आणि इंटरनेट यांचा अति वापर मुलांच्या मानसिक आणि बौद्धिक विकासावर परिणाम करतो. त्यामुळे पालकांनी स्क्रीन टाइमवर नियंत्रण ठेवून वाचन, खेळ, कला आणि सर्जनशील उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच मुलांच्या आवडी-निवडी ओळखून त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. शिस्त आणि स्वातंत्र्य यामध्ये समतोल राखणे, घरात सकारात्मक आणि आनंदी वातावरण निर्माण करणे, तसेच शिक्षकांशी सतत संपर्क ठेवणे हेही पालकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. शिक्षकांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार अध्यापन करणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांना एकाच पद्धतीने शिकविणे योग्य ठरत नाही. काही विद्यार्थी दृश्य माध्यमातून, काही श्रवणातून, तर काही प्रत्यक्ष कृतीतून अधिक चांगले शिकतात. त्यामुळे म्हणजेच भिन्न पद्धतीने अध्यापन करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी सकारात्मक अभिप्राय देऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवावा, चुका दाखवताना प्रोत्साहनही द्यावे.

समूह कार्य आणि वैयक्तिक लक्ष यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, संवाद आणि नेतृत्वगुण विकसित होतात. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा आणि अपेक्षांचा दबाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या खचतात. अशा वेळी शिक्षकांनी समुपदेशकाची भूमिका निभावत विद्यार्थ्यांना समजून घेणे आणि त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा सामाजिक कौशल्ये आणि सर्जनशीलता यांच्या संतुलनातूनच घडतो. त्यामुळे समुपदेशन ही केवळ समस्या सोडवण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देण्याची प्रक्रिया आहे. पालक आणि शिक्षक यांनी एकत्रितपणे सकारात्मक वातावरण निर्माण केल्यास प्रत्येक विद्यार्थी आपली सर्वोत्तम क्षमता गाठू शकतो. शेवटी, प्रत्येक मूल हे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. त्याला समजून घेणे, स्वीकारणे आणि योग्य मार्गदर्शन करणे हीच खरी शिक्षणाची व्याख्या आहे. ''प्रत्येक मुलामध्ये काहीतरी विशेष असते; त्या विशेषतेला ओळखून योग्य दिशा देणे हेच खरे समुपदेशन आणि खरे शिक्षण होय.'' **

# 'बेटावरची जीवघेणी रात्र'

संदीप घरत

समुद्रातील असे बेट ज्या बेटाजवळ मासेमारी करण्यासाठी कुणीही मच्छीमार जात नसत. बेटावर एक अमानवीय शक्ती आहे. त्या बेटावर गेलेला कुणीही व्यक्ती पुन्हा कधीही घरी परत आली नाही. अशा प्रकारच्या चर्चा बेटा समोरील गावात सतत ऐकायला मिळत होती आणि हे सर्व माहित असून देखील एक दिवस बेटावर सहलीला जायचं म्हणून आम्ही सर्वांनी ठरविले होते. एक दिवस जंगलाच्या सानिध्यात राहून निसर्गाचा आनंद घ्यावा म्हणून आम्ही सात जण - मी, सुरेश, गणेश, सत्या, मधुकर, चंदू, शुभदा आणि सिमा. आम्ही सर्वांनी एक दिवस सहलीसाठी बेटावर जाण्याचा निर्णय घेतला. आमच्याशी संबंध असणाऱ्या एका नातेवाईकांनी ओळखीच्या होडीवाल्याशी संपर्क केला. होडीवाला आम्हाला त्या बेटावर सोडण्यास तयार नव्हता पण आम्हीच होडीवाल्याला जास्त पैसे कबूल करून आम्हाला बेटावर सोडण्यासाठी राजी केलं.

आमचं सर्वांचं बेटावर सहलीला जायचं ठरलं होतं त्यामुळे, मी सर्वांशी संपर्क करून, सर्वांना दिवस आणि वेळ सांगितली. ठरलेल्या वेळेनुसार आम्ही सर्वजण होडीवाल्या काकांच्या घरी गेलो आणि काकांसोबत होडीत बसून गावापासून २ किलो मीटर लांब असणाऱ्या बेटाच्या दिशेने आम्ही जाण्यासाठी निघालो. सर्वजण आनंदात होते. मला मात्र सगळ्यांची चिंता वाटत होती. कारण मीच बेटावरील सहलीसाठी पुढाकार घेतला होता. तब्बल १ तासाच्या प्रवासानंतर आम्ही बेटाजवळ पोहचलो. आम्हाला बेटाजवळ सोडल्यानंतर काकांनी आम्हाला एक गोष्ट आवर्जून सांगितली ती म्हणजे ''सूर्यास्त झाल्या नंतर समुद्राच्या किनाऱ्यावर जावू नका. घाबरू नका. काही भीतीदायक गोष्टी घडल्या तर मला संपर्क करा. मी लगेच तुमच्या मदतीला येईन.'' असे म्हणत होडीवाले काकांनी आम्हाला धीर दिला आणि स्वतःचा संपर्क क्रमांक मला दिला. मी माझ्या मोबाईल मध्ये 'होडीवाले काका' या नावाने काकांचा नंबर सेव्ह केला. काका आम्हाला हात करून होडी घेवून गावाच्या दिशेने निघाले. पण काकांचा चिंताग्रस्त चेहरा माझ्या डोळ्यासमोर सतत येत होता. मात्र माझ्या मित्रांनी काकांचे बोलणे हसण्यावरी घेतले.

बेटावर आम्हाला संध्याकाळ झाली होती. मोबाईलमध्ये बघितले असता ५:३० वाजले होते. सूर्य मावळत होता तसा बेटावरचा प्रकाश कमी होत चालला होता आणि अंधार पडण्यास सुरवात झाली होती. आम्ही आमच्या सोबत टॉर्च, मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात पुढे जात होतो. आम्ही जंगलातून जस जसे पुढे गेलो आणि आम्हाला एक उंच आणि मोठा वाडा दिसला. आम्ही त्या वाड्याच्या बाहेर थांबून कुणी आहे का? म्हणून हाक मारली, पण आम्हाला काहीही उत्तर आले नाही, म्हणून आम्ही वाड्याच्या आत गेलो. वाड्याच्या आत फाटलेली जाळी, तुटलेली चूल आणि फुटलेले मडके होते. गंजीत एक कंदील होते ज्यात ना तेल होते ना वात. आजूबाजूला जुन्या झालेल्या कपड्यांनी भरलेल्या बॅगा पडलेल्या होत्या. त्यामुळे इथे कुणीतरी राहत होते हे मात्र नक्की. रात्री ९ वाजता आम्ही आमच्या सोबत आणलेली भाकरी आणि मासे खाल्ले आणि सोबत आणलेल्या बिसलेरीच्या बाटल्यांमधील पाणी पिऊन आम्ही सर्वजण गप्पा मारण्यासाठी वाड्याच्या बाहेर बसलो. वाड्या सभोवतालची लाकडे आणि सुकी झाडाची पाने गोळा करून आम्ही शेकोटी समोर गप्पा मारत बसलो होतो. गप्पा मारत असताना थंडी अचानक वाढत जात होती. गप्पा सुरु असतानाच आम्हाला वाड्याच्या मागच्या बाजूला कोणीतरी चालत आमच्या दिशेने येत आहे असे वाटले. त्याच्या पाऊलांचा आवाज आमच्या कानावर येत होता, म्हणून आम्ही सगळेजण शांत झालो. आम्ही सगळेजण उठून वाड्याच्या मागच्या बाजूला गेलो. सत्याने आजू बाजूला टॉर्च मारली पण तिथे कुणीच नव्हते.

''मला खूप भीती वाटतंय. आपण सर्वांनी वाड्यात जावू या'' सिमा घाबरलेल्या आवाजात म्हणाली. त्यामुळे आम्ही सर्वजण वाड्यात गेलो आणि गप्पा मारता मारता आम्ही सर्व झोपी गेलो. रात्रीचे ३ वाजले असतील मला एका बाईच्या रडण्याचा आवाज ऐकू येत होता. म्हणून मी उठलो तर पाहतो तर सर्वजण झोपले होते पण मधुकर मात्र दिसत नव्हता. वाड्याचा दरवाजा उघडा होता. मी सर्वाना जागे केले आणि ''मधुकर कुठे आहे'' म्हणून सर्वांना विचारले. सगळेच घाबरलेल्या अवस्थेत हातात टॉर्च, मोबाईल टॉर्च, काठ्या घेवून वाड्याच्या बाहेर पडलो. आम्हाला सर्वांना एका बाईच्या रडण्याचा आवाज येत होता म्हणून आम्ही सर्वजण त्या आवाजाच्या दिशेने निघालो. आम्ही सगळीकडे टॉर्च मारून पहिले असता समुद्राच्या किनाऱ्यावरून मधुकर समुद्राच्या दिशेने पाण्यात जात असताना आम्ही पहिले. मी लगेच होडीवाल्या काकांना संपर्क केला आणि ''आम्ही संकटात आहोत. आम्हाला तुमची मदत हवी आहे. तुम्ही लवकर या.'' असे बोलून आम्ही सर्वांनी मधुकरला मोठ्याने आवाज दिला ''थांब मधुकर, समुद्रात जावू नको. मागे फिर''. परंतु तो पुढेच जात होता. आम्ही सगळेजण मधुकरच्या दिशेने धावत गेलो. सत्याने मधुकरच्या दिशेने टॉर्च मारली. त्या वेळी जे दृश्य दिसले ते दृश्य पाहून आमच्या सर्वांच्या अंगावर काटा आला. मधुकरच्या समोरून पाण्यातुन एक काळी गडद आकृती वर येत होती. तिचे केस असताव्यस्त पसरलेले आणि तिचे डोळे लाल भडक दिसत होते. तिचे हाथ खूप लांब होते. ती आकृती मधुकरच्या दिशेने तिचे लांब हात पुढे करत होती आणि तिच्या तोंडातुन निघणारा तिचा हसण्याचा आवाज आमचा थरकाफ उडवत होता. ''मधुकर, मधुकर'' सत्याने ओरडून मधुकरला मागे खेचले. त्यावेळी मधुकर भानावर आला. त्याचे शरीर बर्फसारखे थंड पडले होते. मधुकर सहित आम्ही सर्वजण जीव मुठीत घेवून घनदाट जंगलातून वाट मिळेल तिथे पळत होतो. पण आमचा पाठलाग करणारी विक्राळ आकृती आमच्यापेक्षा वेगवान होती. आम्ही धावत असताना अचानक वाऱ्याचा वेग वाढत होता. झाडे मोठमोठ्याने हलत होती. कुठे जायचे कुठे नाही. काहीही समजत नव्हत. आम्ही वाऱ्याच्या वेगाने धावत होतो. धावता, धावता शुभदाचा पाय एका दगडाला लागला आणि ती पडली.

''वाचवा, मला वाचवा'' ती ओरडली. आम्ही जेव्हा मागे बघितले तेव्हा ती काळी कुट्ट आकृती शुभदाच्या अगदी जवळ पोहचली होती. त्या आकृतीचे चेहरे क्षणाला बदलत होते. कधी ती रडणाऱ्या बाई सारखी दिसायची, तर कधी ती चेटकीणी सारखी दिसायची. तीने शुभदाचा पाय हवेत उचलून घेतला, त्यावेळी शुभदाच्या तोंडून ''मला वाचवा मला वाचवा'' हे शब्द पडत होते. त्याच वेळी गणेश ने मोठया हिम्मतीने त्याच्याकडे असलेल्या काठीला कापडे बांधून त्या कपड्याना आग लावून ती जळणारी काठी त्या आकृतीच्या दिशेने फेकली. अग्नीची व्याधी होताच ती आकृती एक भयानक किंकाळी करून मागे सरकली. तिच्या किंकाळीचा आवाज इतका भयानक होता की कानातून रक्त येण्याची वेळ आली. आम्ही सर्वांनी शुभधाला उचलले आणि तीला धीर देत, आम्ही सर्वजण समुद्रातील होडीच्या दिशेने धावू लागलो. समुद्रातुन बेटाच्या किनाऱ्याकडे काकांची होडी येत होती. आम्ही सर्वांनी जोराने ओरडत, हाथ हलवत काकांना इशारा केला. काकांनी देखील आम्हाला हाथ करून होडी आमच्या दिशेने आणली. मी जेव्हा मागे वळून पहिले तेव्हा, ती भयानक आकृती वाड्याच्या उंच भागावर उभे राहून रागाने आमच्याकडे पाहत होती. जणू काही ती आकृती आम्हाला सांगत होती 'आज वाचलात, पुन्हा नाही वाचणार.' काकांची होडी बेटाच्या किनाऱ्यावर येताच आम्ही सर्वांनी होडीत उड्या मारल्या. मधुकर आणि शुभदा पूर्णपणे घाबरलेले होते. आमचे पडलेले चेहरे आणि अंगावरील जखमा पाहून काकांना सर्वकाही समजले होते. काकांनी क्षणाचाही विलंब न लावता होडी वाऱ्याच्या वेगाने गावाच्या दिशेने नेली. **

# भारतभूमीच्या संरक्षणासाठी मुंबईत होणार 'श्री राजमातंगी महायज्ञ'!



जगन घाणेकर

गेल्या काही वर्षांत जगभरात कुठेनाकुठे लहान मोठी युद्ध अविरत सुरु आहेत. इस्त्रायल आणि हमास यांमधील युद्धात अपरिमित वित्त आणि जीवित हानी झाली. रशिया आणि युक्रेन युद्धानेही जगाची आर्थिक गणिते बदलली. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारतालाही ऑपरेशन सिंदूर घडवावे लागले. इराण, अमेरिका यांमधील वाद तर विकोपाला पोहोचला होता, ज्याचे पर्यावसान एकमेकांवरील विध्वंसक हल्ल्यांमध्ये झाले. या वादाचा फटका भारतालाही मोठ्या प्रमाणात बसला. शेअरबाजार कोलमडला, भारतातील जीवनावश्यक वस्तूंचे दर कडाडले. स्वयंपाकाच्या गॅसचा तुडवडा आजही भरून निघालेला नाही. इराण आणि अमेरिका यांतील वाद इतका विकोपाला गेला होता कि आज ना उद्या तिसऱ्या महायुद्धाला तोंड फुटणार अशीच काहीशी परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली होती. आज जरी दोन्ही देश शांत असले तरी भविष्यात कोणती परिस्थिती उद्भवेल याचा नेम नाही. 'युद्ध हा कोणत्याही समस्येवरील उपाय नाही' असे तत्वज्ञान सांगत असले, तरी हजारो वर्षांपासून केवळ भारतातच नव्हे तर जगभरात युद्धाची परंपरा चालत आली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात लाखोंचा बळी गेला. वित्तहानीची तर मोजदादच नाही. तिसरे महायुद्ध इतके महाभयंकर असणार आहे कि आधीची दोन युद्धे खेळण्याप्रमाणे वाटतील असे भविष्य त्रिकालज्ञानी संतांनी, भविष्यवेत्त्यांनी यापूर्वीच लिहून ठेवले आहे. भारतभूमी ही भगवंताच्या अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आणि साधू संतांच्या मार्गदर्शनाने प्रगल्भ झालेली भूमी असली तरी येणाऱ्या काळात भारतालाही युद्धाचे चटके सोसावे लागतील यात शंका नाही. येणाऱ्या काळात भारतावर युद्ध लादले गेलेच तर अशा परिस्थितीत तपोभूमी भारताभोवती संरक्षकवच निर्माण व्हावे आणि भारताची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी सनातन संस्थेच्या वतीने मुंबईत श्री राजमातंगी यज्ञाचे आयोजन करण्यात आल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले.

कोणत्याही युद्धाच्या आरंभी यज्ञ करून देवी देवतांना आवाहन करणे, त्यांचे कृपाशिर्वाद मिळवणे, युद्धासाठी त्यांचे सूक्ष्म रूपाने साहाय्य मिळवणे ही प्रथा भारतात पूर्वापार चालत आलेली आहे. पौराणीक कथांतून आपण याबाबत वाचले आहे, दूरदर्शनवरील रामायण-महाभारत यासारंख्या मालिकांतून आपण पाहिले आहे. राजमातंगी ही विजयप्रदा असल्याने सध्याच्या परिस्थितीला अनुसरून श्रीराजमातंगी यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. आदिशक्ती देवी सतीची कथा आपणा सर्वांना माहीतच आहे. भगवान महादेवांवरील मालिकांतून आपण ती पहिली आहे. देवी सतीच्या क्रोधातून निर्माण झालेली शक्तीची १० रूपे ज्यांना 'दशमहाविद्या' असे म्हटले जाते. 'काली, तारा, षोडशी, भुवनेश्वरी, त्रिपुरभैरवी, छिन्नमस्ता, धूमावती, बगलामुखी, मातंगी आणि कमला' अशा या दशमहाविद्या आहेत. त्यांतील मातंगी ही 'वाणी' आणि 'ज्ञान' यांच्याशी संबंधित देवता आहे. मातंगी आदिशक्तीची प्रधानमंत्री (सल्लागार) असल्याने तिला 'श्री राजमातंगी' असे म्हटले जाते. या देवीच्या उपासनेने शत्रूवर नियंत्रण प्राप्त होत असल्याने सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत तपोभूमी भारताचे रक्षण होण्यासाठी श्री राजमातंगीदेवीचे संरक्षककवच आवश्यक आहे. श्रीविष्णूच्या विविध दशावतारांच्या वेळीही दशमहाविद्या कार्यरत होत्या. त्रेतायुगात श्रीरामाच्या अवताराच्या वेळी श्री राजमातंगीदेवीचे तत्त्व कार्यरत होते; म्हणून आदर्श रामराज्य स्थापन झाले. सद्य:स्थितीत भारतातही अनाचार वाढला आहे, अनेक प्रकारची संकटे आ वासून उभी आहेत या सर्वांतून भारताचे रक्षण व्हावे, भविष्यात भारतावर युद्धसंकट ओढावलेच तर भारतभूमीचे सर्वतोपरी रक्षण व्हावे आणि भारतात पुन्हा एकदा लोककल्याणकारी रामराज्य स्थापन व्हावे यासाठी श्रीराजमातंगीदेवीची कृपा आवश्यक आहे. श्री राजमातंगदेवीला 'मंत्रिणी' म्हटले जाते. यज्ञाद्वारे निर्माण होणाऱ्या सात्त्विक लहरींमुळे प्रतिकूल परिस्थितीतही डगमगून न जाता धैर्याने उभे रहाण्याची शक्ती यातून मिळते. प्राचीन काळापासून राजे-महाराजे युद्धाला जाण्यापूर्वी यज्ञ करत असत. मुंबईत येत्या रविवारी म्हणजेच १७ मेला मुंबईतील सुप्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिराच्या मागे नर्दुल्ला टँक मैदानात भव्य स्वरूपात श्रीराजमातंगी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातून हजारो भाविक आणि भक्तगण या यज्ञाला उपस्थित राहणार आहेत. विविध साधू संतांच्या आणि मान्यवरांच्या उपस्थितीत दुपारी साडेतीन ते साडेसात या वेळेत हा यज्ञ संपन्न होणार आहे. या महायज्ञाचा प्रारंभ श्री गणेशाचे आवाहन करून, पुण्याहवाचन करून आणि महासंकल्प करून करण्यात येणार आहे. त्यानंतर श्री राजमातंगीदेवीच्या मूलमंत्राचे पारायण करत द्रव्यांची आहुती देण्यात येणार आहे. महापूर्णाहुती आणि सामूहिक प्रार्थना करून यज्ञाची सांगता होईल. यावेळी श्री राजमातंगीदेवीची स्तुती करून भारताचा सर्वांगीण विकास अणि रक्षण यांसाठी सामूहिक प्रार्थना घेण्यात येणार आहे. नावनोंदणी करून या यज्ञाला अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सनातन संस्थेने केले आहे. **

# जीवनानुभव देणाऱ्या कथा

आस




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

आस, हा अपर्णा महाजन यांच्या पूर्वप्रकाशित, अठरा कथांचा संग्रह, ग्रंथालीने देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. या पुस्तकाला सदानंद मोरे यांची वेधक प्रस्तावना लाभली आहे. सदानंद मोरे यांनी 'आस' या शब्दाचे विविध संदर्भ दिले आहेत. सर्वसामान्य माणसालाही विशिष्ट 'आस'असू शकते हेही ते स्पष्ट करतात. 'मनोगत'मध्ये अपर्णा महाजन यांनी आपली वाचन, लेखनाची जडणघडण स्पष्ट केली आहे. जीवनातील विविध अनुभवांना त्यांनी कथांद्वारे शब्दरूप दिले आहे. त्याद्वारे, कथेतील विविध पात्रांकडे अलिप्तपणे बघण्याची त्यांची वृत्ती स्पष्ट होते. अन्वर हुसेन यांचे रंगीत मुखपृष्ठ काहीसे गूढ स्वरूपाचे वाटते.

काठी, या पहिल्या कथेतील शाळकरी वयातील गोविंदा, मोठा होऊ लागल्याने, त्याला वडिलांच्या वर्तनातील दोष जाणवतात. कालांतराने अपघाती मरण पावलेल्या आपल्या वडिलांच्या पेटणाऱ्या चितेमध्ये, त्यांची आवडती, पण इतरांना सतत भीती वाटायला लावणारी, भक्कम काठी टाकून, तो भीतीतून मुक्त होतो. त्याची आईही या भीतीपासून मुक्त होऊन, गोविंदाला जवळ घेऊन मुक्तपणे, हंबरडा फोडते. प्रतिसाद, या कथेतील शुभा, श्रीमंत वर्गातील, कार्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या, पण यंत्रांप्रमाणे वागणाऱ्या जवळच्या साऱ्यांचा निरोप घेते आणि समाजकार्य करणाऱ्या घननीळबरोबर भिल्ल वस्तीतील कार्यशाळेत सहभागी होण्याचा निर्णय घेते. 'अडसर' या कथेतील इरा आणि सौमित्र यांचा विवाह होतो. दोघेही परस्परांना अनुरूप. त्यामुळे ते दोघे आणि त्यांचे कुटुंबीय खुश असतात. हनिमूनच्या वेळी इराला त्याच्या सामानात, स्कर्ट आणि टॉप, हा स्त्रीचा पोशाख आढळतो. तिच्या मनात विविध विचारांची, शंकाकुशंकांची आंदोलने निर्माण होतात. मीलनाच्या रात्री, सौमित्र बदामी स्कर्ट आणि स्ट्रॉबेरीचे डिझाईन असलेला टॉप घालून, निवांतपणे इराची वाट पाहत पलंगावर पहुडला होता. अस्वस्थ झालेली इरा कालांतराने आपल्या खास, मानसशास्त्रज्ञ आणि बालमैत्रीण असलेल्या सुधाला भेटते. प्रत्यक्ष भेटीनंतरच्या चर्चेमुळे, इराच्या मनातील सारी किल्मिषे दूर होतात. 'कॉफी डेट' या कथेतील पती-पत्नी दीर्घकाळानंतर, योगायोगाने आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटण्याऐवजी, परस्परांनाच योगायोगाने भेटतात, त्याची गंमत वाटते. जीवन किती धावपळीचे झाले आहे की, ज्यामुळे परस्परांना सवडीने भेटणे आणि जाणून घेणे हेही शक्य होत नाही, याची तीव्रतेने जाणीव होते.

हिऱ्यांचा हार आणि एका व्यग्र ब्रोकरची प्रणयकथा या अनुक्रमे मोप्पासा आणि ओ हेन्री यांच्या अनुवादित कथा अप्रतिम आहेत. दोन्ही कथांतील ''शेवटचा धक्का'' विलक्षण! निर्णय या कथेतील आईच्या पोटरीजवळील पांढरा डाग पाहून घरातील सारे अस्वस्थ होतात. यामुळे सुषमाच्या लग्नामध्ये मुलाकडील सारे, डॉक्टर बहिणीच्या मदतीने साऱ्या तपासण्या करून लग्नाचा निर्णय घेतात. मात्र नंतरचा सुषमाचा विवेकी निर्णय धक्कादायक ठरतो. पार्टी या कथेतील, अनुरूप प्रभाकर आणि गौरी यांचे लग्न होते. अल्पावधीतच प्रभाकर हा शास्त्रज्ञ असल्याने जर्मनीला, आपल्या व्यावसायिक आणि आर्थिक प्रगतीसाठी, पुणे सोडून जातो. कालांतराने गौरीला तिकडे जाण्याविषयी सांगितले जाते. तिच्या मनात विचारांचे वादळ उठते. आपली आवडती नोकरी आणि करिअर सोडून, गौरी प्रभाकरच्या 'व्यक्तिगत' सेवेसाठी जर्मनीला जाते आणि नंतर त्याच्या मित्रमैत्रिणींमध्ये रमून जाते. रात्री एका पार्टीच्यावेळी, ती आपले परखड मनोगत मांडते आणि तेथील सारेच, विशेषतः समवयस्क स्त्रिया, अंतर्मुख होतात. प्रभाकरही तिच्या बोलण्याचे एकांतात कौतुक करतो आणि ते समाधानाने, तनमनाने जवळ येतात.

बळी, या कथेतील प्रसन्ना महाशब्दे मोठ्या उत्साहाने, एका महाविद्यालयात प्राध्यापकपदी, गुणांच्या जोरावर नियुक्त झाल्याने, शिकवायला सुरुवात करतो. हळूहळू त्याला उच्चशिक्षण क्षेत्रातील विविध दोषांची जाणीव होऊ लागते आणि त्याचा भ्रमनिरास होतो. आपल्या देशातील, सर्वच क्षेत्रांतील, झपाट्याने आणि वेगाने होणारी ''घसरण'' या कथेतून प्रकर्षाने स्पष्ट होते. रानवारा, या कथेतील रुक्मीच्या जीवनाची झालेली फरपट आणि ग्रामीण भागातील विधवा स्त्रीविरोधी कौटुंबिक वातावरण, सुजाण वाचकाला अस्वस्थ करते. गुलाबी पावडर ही कथाही पुष्पाच्या जीवनाची झालेली वाताहत स्पष्ट करते. हरवलेली सावली आणि मन पाखरू पाखरू, या कथांतील कॉलेजमधील वातावरण शब्दबद्ध करण्यात अपर्णा महाजन यशस्वी झाल्या आहेत. वयात आलेल्या मुलामुलींच्या जीवनातील अनेक घडामोडींची त्यामधून स्पष्ट जाणीव होते. 'स्वेच्छा' या कथेतील अनाथाश्रमात राहणारा आठ-नऊ वर्षांचा वरुण तेथेच रमला आहे.

नव्याने लाभलेल्या आपल्या आई-वडिलांकडे तो जाण्यास, शेवटी तो कसा तयार होतो, हे या कथेत विलक्षण प्रभावीपणे मांडले आहे. ही कथा वाचताना, वाचकाचे डोळे भरून आल्याशिवाय राहणार नाहीत. ऑस्कर वाइल्ड यांच्या ''द सेल्फिश जायंट'' या परिकथेचा सुंदर, स्वैर अनुवाद 'स्वार्थी राक्षस' या नावाने लेखिकेने केला आहे. बेनिपट्टी या कथेमध्ये, पुण्यात आलेल्या, बिहार राज्यातील, मधुबनी जिल्ह्यातल्या, एका कुटुंबाला, पुन्हा बेनिपट्टीमध्ये परत जावे लागते. पुण्यात घरकाम करताना, हुशार रतन अनेक गोष्टी शिकून घेते आणि आपल्या ग्रामीण भागातील, स्त्रियांना शेती व्यतिरिक्त इतर उत्पन्नात वाढ करण्यास त्यांना प्रोत्साहन देते. 'आस' ही या कथासंग्रहातील, एक सर्वोत्तम कथा आहे. प्रौढ स्त्रीपुरुषांच्या जीवनातील, विविध आणि सूक्ष्म ताणतणाव उत्तम प्रकारे, या कथेतून व्यक्त होतात. ''आस'' या कथासंग्रहातील, अपर्णा महाजन यांच्या कथा, दीर्घकाळ लक्षात राहतील अशाच आहेत. प्रत्येक कथेची मांडणी अत्यंत सुबक पद्धतीने केली आहे. प्रत्येक कथेतील प्रत्येक पात्र कसा विचार करत असेल, याचे उत्तम प्रत्यंतर या कथासंग्रहातून येते. यातील काही कथा, निश्चितच कादंबरीमध्ये रूपांतरित करण्याच्या क्षमतेच्या आहेत. साहित्य, संगीत, कला या विविध क्षेत्रांची उत्तम जाणकारी, लेखिकेला असल्याचे जाणवते. उच्च विद्याविभूषित प्रा. डॉ.अपर्णा महाजन यांचा परिचय, त्यांच्या छायाचित्रासह दिला आहे. **

पुस्तकाचे नावः आस
लेखिका : अपर्णा महाजन
९८२२०५९६७८
प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई-१६
पहिली आवृत्ती : २५ डिसेंबर २०२०
दुसरी आवृत्ती : १५ जुलै २०२३
पृष्ठे : १७०, मूल्य : रू. २००/-

# दुहेरी संकटाच्या चक्रव्यूहात जग

**जगासमोर हळूहळू एक असे संकट उभे राहत आहे, जिथे तीव्र उष्णता आणि दुष्काळ या दोन वेगळ्या आपत्ती राहिल्या नसून एकत्रितपणे मानवी जीवनावर घातक परिणाम करत आहेत. एका नवीन वैज्ञानिक अभ्यासानुसार हवामान धोरणांमध्ये ठोस बदल न झाल्यास या शतकाच्या अखेरीस पृथ्वीवरील सुमारे २८ टक्के म्हणजेच सुमारे २६० कोटी लोक उष्णता आणि दुष्काळाच्या दुहेरी संकटाचा सामना करत असतील.**



मिलिंद बेंडाळे

जगात तीव्र उष्णता आणि दुष्काळाचा धोका आजच्या तुलनेत पाचपटींनी वाढणार आहे. हे केवळ हवामानाशी संबंधित संकट नाही, तर जीवन, उपजीविका आणि भविष्यावर एकाच वेळी झालेला हा हल्ला आहे. गेल्या दोन दशकांमधील कल पाहिला तर या बदलाचे संकेत स्पष्ट दिसू लागले आहेत. २००१ ते २०२० दरम्यान, जगाने दर वर्षी सरासरी चार वेळा अशी परिस्थिती अनुभवली आहे, जेव्हा भीषण उष्णता आणि दुष्काळाच्या संकटाशी एकाच वेळी सामना करावा लागला. ही आकडेवारी औद्योगिक कालखंडापूर्वीच्या (१८५० ते १९००) काळाच्या तुलनेत दुप्पट आहे. या पार्श्वभूमीवर शास्त्रज्ञांनी अशी भीती व्यक्त केली आहे, की परिस्थिती अशीच राहिली, तर या शतकाच्या अखेरीस दर वर्षी अशा घटना सुमारे दहा वेळा घडू शकतात आणि प्रत्येक घटना दोन आठवड्यांपर्यंत लोकांना होरपळून टाकू शकते. हा केवळ हवामानातील बदल नाही, तर जीवनाचा वेग थांबवून टाकणारे संकट आहे. शास्त्रज्ञांच्या मते, उष्णता आणि दुष्काळ एकमेकांना वाढवतात आणि ते दोन्ही एकत्र येतात, तेव्हा त्यांचा फटका अनेक पटींनी वाढतो. शेतातील उभी पिके सुकतात, पाण्याचे स्रोत आटतात, जंगले पेटू लागतात आणि बाजारपेठेत अन्नधान्याच्या किमती झपाट्याने वाढतात. उष्णता आणि उष्माघात यमराजाप्रमाणे काम करू लागतात. याचा सर्वाधिक फटका उघड्या अवकाशाखाली काम करणाऱ्यांना बसतो. त्यात मजूर, शेतकरी आणि बांधकामक्षेत्राशी संबंधित लोकांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी ही केवळ गैरसोय नसून जीवन-मरणाचा प्रश्न बनतो.

या शतकाच्या अखेरीस परिस्थिती कशी बदलू शकते, हे समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी आठ हवामान मॉडेल्सवर आधारित १५२ सिम्युलेशनचे विश्लेषण केले आहे. यामध्ये लोकसंख्येतील वाढ आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या विविध परिस्थितींचा समावेश करण्यात आला आहे. त्याचा तपशील 'आयपीसीसी'च्या सहाव्या मूल्यांकन अहवालात नमूद केला आहे. या अभ्यासात 'उष्णता-दुष्काळ'च्या घटनांची व्याख्या अशा दिवसांच्या रूपात केली आहे, जेव्हा तापमान त्याच्या सामान्य पातळीच्या वरच्या दहा टक्क्यांमध्ये असते आणि सोबतच किमान मध्यम स्तराचा दुष्काळही असतो. ही तुलना १९६१ ते १९९० च्या आधारभूत कालावधीच्या आकडेवारीशी केली गेली आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष 'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स' या नामांकित आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. या संकटाचे सर्वात कटू सत्य म्हणजे त्यातील विषमता. ज्या देशांनी हरितगृह वायूंचे सर्वात कमी उत्सर्जन केले, म्हणजेच जे हवामान संकटासाठी सर्वात कमी जबाबदार आहेत, त्यांनाच या दुहेरी हल्ल्याचा सर्वाधिक सामना करावा लागणार आहे. यात विशेषतः कमकुवत आणि उष्णकटिबंधीय क्षेत्रात राहणाऱ्या लोकांचा समावेश आहे.

एसी-कुलरसारखी साधने उपलब्ध नसलेल्या तसेच आरोग्यसेवाही मजबूत नसलेल्या लहान देशांमधील आर्थिकदृष्टया दुर्बल समाजात हे संकट दैनंदिन जीवन अधिक कठीण करेल. पाणी संपल्यानंतर दुसरा कोणताही पर्याय नसणे, हा या धोक्याचा सर्वात भयानक पैलू आहे. शास्त्रज्ञांचा अंदाज आहे, की २०३० मध्ये ६.६ टक्के लोकसंख्या या धोक्याच्या छायेत असेल, तर २०९० पर्यंत हा आकडा २८ टक्क्यांवर पोहोचेल. म्हणजेच येणाऱ्या वर्षांमध्ये हे संकट वेगाने वाढणार असून कोट्यवधी लोकांना कचाट्यात घेणार आहे. एका सरासरी श्रीमंत देशातील नागरिकाचे आयुष्यभराचे कार्बन उत्सर्जन दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला या धोकादायक 'उष्ण-कोरड्या' परिस्थितीमध्ये ढकलू शकते. ही आकडेवारी जागतिक विषमता अधिक स्पष्ट करते. जगातील देशांनी आपली हवामानविषयक आश्वासने गांभीर्याने पाळल्यास हा धोका मोठ्या प्रमाणात कमी केला जाऊ शकतो. अशा स्थितीत शतकाच्या अखेरीस प्रभावित लोकसंख्या कमी होऊन सुमारे १८ टक्के राहू शकते. म्हणजेच १७० कोटी लोकांना या दुहेरी संकटाचा सामना करावा लागेल. हा फरक सांगतो, की आज घेतलेले निर्णय येणाऱ्या काळात अब्जावधी जीव सुरक्षित कवा असुरक्षित करू शकतात. आकाशातून बरसणारी झळाळती उष्णता आणि जमिनीखाली लपून बसलेली पाण्याची टंचाई ही केवळ ऋतूंची चक्रे उधळल्याची चिन्हे नाहीत, तर मानवी सभ्यतेसमोर उभ्या ठाकलेल्या नव्या संकटाची चाहूल आहे.

हवामानबदलाच्या वेगाने वाढणाऱ्या परिणामांमुळे आज उष्णतेच्या लाटा आणि दुष्काळ या दोन स्वतंत्र आपत्ती राहिलेल्या नाहीत; त्या एकमेकांना पूरक ठरत अधिक तीव्र, व्यापक आणि घातक स्वरूप धारण करत आहेत. या दुहेरी संकटव्यूहाचा वेध घेताना केवळ पर्यावरणाचा नव्हे, तर अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि सामाजिक न्याय यांचा विचार अपरिहार्य ठरतो. जगभरात गेल्या काही दशकांमध्ये तापमानवाढीचा वेग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसतो. उष्णतेच्या लाटा आता अपवाद राहिलेल्या नाहीत, तर नियमित होत चालल्या आहेत. त्याच वेळी पर्जन्यमानातील अनियमितता आणि पाण्याच्या स्रोतांवरील ताण वाढल्याने दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. या दोन्ही घटना एकाच वेळी घडतात, तेव्हा परिणाम अनेकपटींनी वाढतो. उष्णतेमुळे जमिनीतील आर्द्रता वेगाने कमी होते, तर दुष्काळामुळे पाण्याची उपलब्धता घटते. परिणामी, तापमान आणखी वाढते आणि दुष्काळ अधिक तीव्र बनतो, असे एक दुष्टचक्र निर्माण होते. या दुहेरी संकटाचा सर्वात पहिला आणि तीव्र फटका शेतीला बसतो. भारतासारख्या देशात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना उष्णता आणि दुष्काळाचा संगनमताने होणारा परिणाम अत्यंत गंभीर ठरतो. पिकांची वाढ खुंटते, उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर थेट परिणाम होतो. अन्नधान्याची उपलब्धता कमी झाल्याने बाजारात किमती वाढतात. त्याचा परिणाम शहरातील ग्राहकांवरही होतो. अशा परिस्थितीत अन्नसुरक्षेचा प्रश्न अधिक तीव्र बनतो.

पाण्याच्या उपलब्धतेवर होणारा परिणामही तितकाच चताजनक आहे. नद्या, तलाव आणि भूजलस्तर यांवर आधीच ताण आहे. उष्णतेमुळे बाष्पीभवनाचा दर वाढतो, तर दुष्काळामुळे पाण्याची भर पडत नाही. परिणामी, पाण्याचा तुटवडा अधिक तीव्र होतो. शहरी भागांमध्ये पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो, तर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष वाढतो. भविष्यात 'पाणी युद्धां'ची भीती व्यक्त केली जाते, ती या पार्श्वभूमीवर निराधार नाही. या संकटाचा सर्वाधिक फटका समाजातील सर्वात असुरक्षित घटकांना बसतो. उघड्यावर काम करणारे मजूर, शेतकरी, बांधकाम कामगार यांच्यासाठी उष्णतेच्या लाटा केवळ अस्वस्थता निर्माण करत नाहीत, तर आरोग्यासाठी घातक ठरतात. उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या वाढतात. दुष्काळामुळे रोजगाराच्या संधी कमी होतात, स्थलांतर वाढते आणि सामाजिक अस्थैर्य निर्माण होते. अशा वेळी या घटकांसाठी ही परिस्थिती जीवन-मृत्यूचा प्रश्न बनते. या दुहेरी संकटाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे जागतिक असमानता. हवामानबदलासाठी सर्वाधिक जबाबदार असलेले विकसित देश आणि त्याचा सर्वाधिक फटका सहन करणारे विकसनशील देश यांच्यातील दरी अधिकच वाढत आहे. उष्णकटिबंधीय प्रदेशातील गरीब देशांकडे ना पुरेशी साधने आहेत, ना तांत्रिक क्षमता. त्यामुळे ते या संकटाला सामोरे जाण्यात अधिक असुरक्षित ठरतात. ही परिस्थिती केवळ पर्यावरणीय नव्हे, तर नैतिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण करते. तथापि, या गंभीर चित्रात काही सकारात्मक शक्यतादेखील दडल्या आहेत.

हवामानबदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक स्तरावर विविध करार आणि उपक्रम राबवले जात आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करणे, नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे आणि टिकाऊ विकासाच्या संकल्पनांचा स्वीकार करणे या उपाययोजनांमुळे या संकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते; मात्र उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत गरजेची आहे. स्थानिक पातळीवरही अनेक उपाय करता येऊ शकतात. जलसंधारण, सूक्ष्म सचन, पिकांच्या पद्धतींमध्ये बदल आणि हवामानस्नेही शेती उपाययोजनांमुळे दुष्काळाचा परिणाम कमी करता येतो. शहरी भागात हरित क्षेत्र वाढवणे, उष्णता कमी करणारी पायाभूत सुविधा उभारणे आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणे यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच, आपत्ती व्यवस्थापनाची सक्षम यंत्रणा उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शासनाच्या धोरणांमध्ये दीर्घकालीन दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. नियोजनबद्ध पद्धतीने पायाभूत सुविधा उभारणे, संशोधन आणि विकासावर भर देणे आणि लोकजागृती करणे या बाबींचा समन्वय साधणे गरजेचे आहे. तसेच, सर्वात असुरक्षित घटकांसाठी विशेष योजना राबवणे आवश्यक आहे. उष्णता आणि दुष्काळाचा हा दुहेरी संकटव्यूह आपल्याला एक स्पष्ट संदेश देतो, तो म्हणजे मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलन ढासळले आहे. या संतुलनाची पुनर्स्थापना करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, येणाऱ्या पिढ्यांसाठी आपण अधिक कठीण आणि अस्थिर जग सोडून जाऊ. **

# लखनऊकडून चेन्नईचा दारुण पराभव



**। लखनौ । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा ५९ वा सामना १५ मे रोजी लखनऊ येथील इकाना क्रिकेट स्टेडियमवर लखनऊ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात खेळला गेला. आयपीएल २०२६ मधील प्ले-ऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जला (सीएसके) लखनौ सुपर जायंटस्कडून (एलएसजी) ७ गडी राखून पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. लखनौच्या एकना स्टेडियमवर शुक्रवारी झालेल्या या सामन्यात चेन्नईने दिलेले १८८ धावांचे लक्ष्य लखनौने अवघ्या १६.४ ओव्हर्समध्ये ३ गड्यांच्या मोबदल्यात सहज पार केले. त्यांच्या मिचेल मार्शने अवघ्या ३८ चेंडूंत ९ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ९० धावांची स्फोटक खेळी केली. तर मध्यमगती गोलंदाज आकाश सिंगने भेदक मारा करत २६ धावांत ३ गडी बाद केले. दरम्यान, या पराभवामुळे चेन्नईच्या प्ले-ऑफच्या अडचणी वाढल्या आहेत. कार्तिक शर्मा आणि दुबेची फटकेबाजीया लढतीत लखनौने नाणेफेक जिंकून चेन्नईला फलंदाजीसाठी आमंत्रित केले. चेन्नईची सुरुवात खराब झाली. कर्णधार ऋतुराज गायकवाड (१३) आणि संजू सॅमसन (२०) स्वस्तात बाद झाले. या दोघांना आकाश सिंगने तंबूत धाडले. त्यानंतर २ बाद ३६ वरून चेन्नईच्या ५२ धावा झाल्या असताना उर्विल पटेल ६ धावांवर आकाश सिंगची शिकार बनला. त्यानंतर कार्तिक शर्माने खेळाची सूत्रे आपल्या हाती घेत संघाचा डाव सावरत धावसंख्येला आकार दिला. कार्तिकने ४२ चेंडूंत ७१ धावांची खेळी केली. त्यात ६ चौकार

## ■ प्ले-ऑफचे गणित बिघडले
## ■ मिचेल मार्शची चौफेर टोलेबाजी

आणि ५ षटकारांचा समावेश होता. शहाबाज अहमदने कर्तिकला बाद केले. डेवाल्ड ब्रेवीसने १६ चेंडूंत २ षटकारांसह २५ धावांची जलद खेळी केली. शिवम दुबेने १६ चेंडूंत नाबाद ३२ धावांची धडाकेबाज खेळी करत प्रशांत वीरच्या (नाबाद १३) मदतीने चेन्नईला २० षटकांत ५ बाद १८७ धावांपर्यंत पोहोचवले. लखनौकडून आकाश सिंगने उत्कृष्ट गोलंदाजी करत २६ धावांत ३ बळी घेतले.

### पूरनचा सलग षटकारांचा चौकार

अखेर निकोलस पुरनने १७ चेंडूंत नाबाद ३२ धावा करत २० चेंडू राखून लखनौच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. त्याने एक चौकार आणि चार षटकारांची आतषबाजी केली. डावातील १७ व्या षटकांत अन्शुल कांबोजच्या पहिल्या ४ चेंडूवर चारही षटकार मारत सामना संपविला.

मार्शचे वादळ आणि पुरनची फिनिशिंग १८८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना लखनौच्या सलामीवीरांनी चेन्नईच्या गोलंदाजांची अक्षरशः पिसे काढली. सलामीवीर मिचेल मार्शने चौफेर टोलेबाजी करत अवघ्या ३८ चेंडूंत ९ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ९० धावांची स्फोटक खेळी केली. त्याने अवघ्या २१ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले होते. त्याला जोस इंग्लिसने (३६) चांगली साथ दिली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १३५ धावांची भागीदारी करत लखनौचा विजय सोपा केला. मुकेश चौधरीच्या फेकीवर मार्श धावबाद झाला. त्याचे शतक दहा धावांनी हुकले.

चेन्नई सुपर किंग्सन आतापर्यंत १२ सामने खेळले असून, त्यात सहा जिंकले आहेत आणि सहा गमावले आहेत. सीएसकेकडे सध्या १२ गुण आहेत. १६ गुणांपर्यंत पोहोचण्यासाठी, सीएसकेला त्यांचे उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागतील.

# निवडक



## खो-खो स्पर्धेत दिग्गज संघांची विजयी सलामी

**मुंबई :** मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) स्पोर्ट्स क्लब आयोजित 'पहिली व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धा २०२६' परळ येथील ऐतिहासिक विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या लाल मैदानावरील कै. विवेकानंद पैगावकर क्रीडानगरीत शानदार वातावरणात सुरू झाली. उद्‌घाटनाच्या दिवशीच मैदानावर चुरशीचे सामने, टाळ्यांचा कडकडाट आणि प्रत्येक गुणासाठी झुंज पाहायला मिळाली. आज झालेल्या सामन्यांत बँक ऑफ इंडिया, महावितरण कंपनी, नेवल डॉक आणि मुंबई पोलीस यांनी दमदार विजय नोंदवत विजयी सलामी दिली. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी राहुल सिन्हा (महाव्यवस्थापक, एचआरएमडी, सेंट्रल ऑफिस), भारताचे माजी कुस्तीपटू आणि अर्जुन पुरस्कार विजेते पप्पू यादव तसेच आरबीआय स्पोर्ट्स क्लबचे जनरल सेक्रेटरी सचिन नरसप्पा उपस्थित होते. व्यावसायिक गटाच्या पहिल्या सामन्यात बँक ऑफ इंडियाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचा १९-१७ असा चुरशीच्या लढतीत २ गुणांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात महावितरण कंपनीने गंदेकर इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. वर १५-१४ (मध्यंतर १३-६) असा ७.१० मि. राखून रोमांचक विजय मिळवला. तिसऱ्या सामन्यात नेवल डॉकने ठाणे स्पेशल पोलीस सेलचा १०-९ (मध्यंतर ८-५) असा ७.१० मि. राखून पराभव करत शानदार विजय नोंदवला. दिवसातील चौथ्या आणि सर्वाधिक रंगतदार सामन्यात मुंबई पोलिसांनी यजमान रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया संघावर १७-१५ (मध्यंतर ९-९) असा २ गुणांनी थरारक विजय मिळवला.

## नवी मुंबईमध्ये महाराष्ट्र श्री स्पर्धा

**नवीन पनवेल :** नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन यांचे सौजन्याने राज्यस्तरीय उंची गटाची विविध शरीर सौष्ठव स्पर्धा पार पडली. नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे क्रीडाप्रेमी क्रियाशील सेक्रेटरी डॉ. विजय पाटील यांच्या आयोजनाखाली या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेसाठी नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे उपाध्यक्ष विजय पाटील, चेअरमन दत्तू बी.पाटील (हेल्थ क्लब) खजिनदार संजय निकम आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी स्पर्धेसाठी यांचे मोलाचे सहकार्य झाले. नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे मेचुएर बॉडी बिल्डिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेच्या मान्यतेने या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेच्या वेळी हौशी संघटनेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उपनगर येथे कार्यरत असलेल्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा, पंच यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये नंदकुमार तावडे (मुंबई), अरुण कुरळे (मुंबई), प्रवीण खामकर (मुंबई), शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रशांत नारकर (मुंबई), सुरेंद्र महाडिक (नवी मुंबई), हेमंत पाटील (उपनगर मुंबई), गिरीश शेट्टी (ठाणे) आदी मान्यवरांचा समावेश आहे.

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत अंकुर सघ विजेता

**भाईंदर :** भाईंदरजवळील राई येथील बालयोगी सदानंद बाबा कबड्डी संघाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मुंबईचा अंकुर संघ विजयी झाला असून, मुंबई उपनगरातील जॉली संघ हा उपविजेता ठरला.महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने राई गावात नुकतेच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचा पुरुष गटातील अंतिम सामना अंकुर संघ विरुद्ध जॉली मुंबई उपनगर यांच्यात रंगला त्यात अंकुर संघाने बाजी मारली. ओवली क्रीडा मंडळ व जय हनुमान संघ अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांकावर राहिले. मालिका वीर सुशांत साहिल, उत्कृष्ट चढाई नामदेव ईशावलकर व उत्कृष्ट पकड केतन माफलकर यांना बक्षीस देण्यात आले. कुमारी गटासाठी झालेल्या स्पर्धेत अंतिम विजेता सफाळे येथील कुरडई संघ, तर उपविजेता राई येथील बालयोगी सदानंद बाबा कबड्डी संघ ठरला. या गटातील तृतीय व चतुर्थ बक्षीस अनुक्रमे विरारच्या युवा प्रतिष्ठान व कल्याण येथील ज्ञानशक्ती या संघांना मिळाले. कुमारी गटातील सर्वोत्कृष्ट खेळाडू मालिकावीर म्हणून भार्गवी म्हात्रे हिने पुरस्कार पटकावला. किशोर मुले गटात अंतिम विजेता बालयोगी सदानंद बाबा कबड्डी संघ व छत्रपती भाईंदर संघ हा उपविजेता ठरला. या गटात मालिका वीर बालयोगी संघाचा संदीप बिश्वकर्मा, तसेच उत्कृष्ट पकड राज रेड्डी व उत्कृष्ट चढाई विवेक, उत्कृष्ट पकड पायल बेलेकर, उत्कृष्ट चढाई पुरस्कार संजना भोईर यांना देण्यात आले.

# मुंबई, कोल्हापूर, इचलकरंजी उपांत्य फेरीत

**। नूल । प्रतिनिधी ।**



नूल येथील तिरंगा क्रीडा मंडळ, न्यू इंग्लिश स्कूल आणि आजी-माजी खेळाडू यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेला आज उत्साहात प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी मुंबईचा महाराष्ट्र पोलीस, कोल्हापूर पोलीस, इचलकरंजीचे महाराष्ट्र मंडळ यांनी प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून विजयी सलामी दिली. यजमान तिरंगा क्रीडा मंडळाने बेळगावला २-१ असे नमवून उपांत्य फेरी गाठली.

लाकल्लाप्पाण्णा नडगदल्ली यांच्याहस्ते स्पर्धेचे उदघाटन झाले. पहिल्या सामन्यात तिरंगा क्रीडा मंडळाने बेळगावचा २-१ असा पाडाव केला. तिरंगाच्या रितेश मांगलेने पहिला मैदानी गोल करून धडाकेबाज सुरवात केली. पण, बेळगावच्या प्रवीणने गोल करून सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. उत्तरार्धात तिरंगाच्या प्रज्वल काळेने निर्णायक गोल करून स्थानिक शौकिनांना जल्लोषाची संधी दिली.

दुसऱ्या सामन्यात इचलकरंजी महाराष्ट्र क्रीडा मंडळाने फिरोज वस्ताद, सरोज पाटीलच्या गोलमुळे गदग स्पोर्टसवर २-१ अशी मात केली. गदगचा गोल करणारा जीवनची झुंज व्यर्थ ठरली. रंगतदार सामन्यात मुंबई पोलिसने कोल्हापूरच्या महाराष्ट्र क्रीडा मंडळाला २-१ असे पराजित करून आव्हान संपुष्टात आणले. दोन गोल करणारा मुंबईचा रोहन पोवार विजयाचा शिल्पकार ठरला. चौथ्या सामन्यात कोल्हापूर पोलीस संघाने ईश्वरपूरच्या निशिकांतदादा फाउंडेशनला ३-१ असे हरवून आगेकूच केली. कोल्हापूरच्या सत्यजित सावंत, विनोद मनुगडे, मुकूंद रजपूत यांनी प्रत्येकी एक गोल मारला. ईश्वरपूरच्या स्वप्निल पाटीलचा गोल संघाचा पराजय टाळू शकला नाही.

याप्रसंगी एस. आर. जाधव, श्रीरंग चौगुले, जयसिंगराव चव्हाण यांच्यासह खेळाडू उपस्थित होते. सचिन शिंदे यांनी स्वागत केले.तर सचिन पोवार यांनी आभार मानले.

# साहिल जाधवला तिरंदाजीत कांस्यपदक

**। सातारा । प्रतिनिधी ।**



साताऱ्याच्या साहिल जाधवने शांघाय येथे सुरू असलेल्या तिरंदाजी वर्ल्ड कपमध्ये कंपाऊंड पुरुषांच्या वैयक्तिक प्रकारात कांस्य पदक जिंकून इतिहास घडवला आहे. हे त्याचे वर्ल्ड कपमधील पहिलेच वैयक्तिक पदक आहे. कांस्यपदकासाठी झालेल्या सामन्यात साहिलने डेन्मार्कच्या अनुभवी मार्टिन डॅमसबोचा १४७-१४४ असा पराभव केला. यशानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. सामन्याच्या सुरुवातीला तो एका गुणाने मागे होता, मात्र दुसऱ्या फेरीत त्याने अचूक वेध घेत आघाडी मिळवली आणि ती शेवटपर्यंत टिकवून ठेवली.

उपांत्य फेरीत त्याचा फ्रान्सच्या निकोलस गिरार्डकडून अवघ्या दोन गुणांच्या फरकाने (१४७-१४५) पराभव झाला होता. या स्पर्धेत त्याने भारताचा वरिष्ठ खेळाडू अभिषेक वर्मा आणि ऑस्ट्रियाच्या निको विनर सारख्या दिग्गज खेळाडूंना नमवून आपली छाप पाडली. साहिल हा साताऱ्यातील करंडी या गावचा आहे आणि त्याचा प्रवास सोपा नव्हता. कोविड-१९ महामारीच्या काळात त्याचे वडील राजेश जाधव यांची नोकरी सुटली होती. तरीही मुलाच्या प्रशिक्षणात खंड पडू नये म्हणून साहिलच्या आईने स्वतःचे दागिने विकून त्याला खेळासाठी लागणारे महागडे साहित्य घेऊन दिले. त्याने साताऱ्यातील दृष्टी आर्चरी अकॅडमीमध्ये प्रशिक्षक प्रवीण सावंत यांच्याकडे तिरंदाजीचे धडे गिरवले. त्यानंतर त्याने कोलकाता येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण केंद्रात प्रशिक्षक हरेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सराव केला. साहिलने शिवाजी विद्यापीठातून मनॅनो टेक्नॉलॉजी आणि नॅनो सायन्सफमध्ये पदवी पूर्ण केली आहे. सध्या तो साताऱ्यातील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये फिजिक्समध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. जागतिक विद्यापीठ स्पर्धेत निवड होण्यापूर्वी साहिलला अनेक राष्ट्रीय स्पर्धा आणि चाचणी फेऱ्यांमध्ये अपयशाचा सामना करावा लागला होता.

२०२४ आणि २०२५ च्या वर्ल्ड कप चाचण्यांमध्ये तो अवघ्या काही गुणांनी पिछाडीवर राहिल्यामुळे संघात स्थान मिळवू शकला नव्हता. मात्र, २०२५ च्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्समध्ये (जर्मनी) त्याने वैयक्तिक सुवर्णपदक जिंकून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यानंतर २०२६ मध्ये शांघाय वर्ल्ड कपमध्ये त्याचे पहिले पदक निश्चित केले. ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणे आणि पदक जिंकणे, हे त्याचे अंतिम ध्येय आहे.

## विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलिया संघ सज्ज

**नवी दिल्ली :** इंग्लंड आणि वेल्समध्ये रंगणाऱ्या आगामी महिला टी-२० विश्वचषक २०२६ साठी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने आपल्या १५ सदस्यीय बलाढ्य संघाची घोषणा केली आहे. १२ जूनपासून सुरू होणाऱ्या या महाकुंभासाठी ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व अष्टपैलू खेळाडू सोफी मोलिनक्सकडे सोपवण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियन संघात एलिस पेरी, बेथ मूनी, गार्डनर, मेगन शट यांसारख्या दिग्गज खेळाडूंचा समावेश आहे, ज्या कोणत्याही क्षणी सामन्याचे पारडे फिरवण्याची क्षमता ठेवतात. जॉर्जिया वोल ही २२ वर्षीय खेळाडू आपला पहिला टी-२० विश्वचषक खेळण्यासाठी सज्ज आहे.



● शिवाजी पार्क जिमखान्याचे माधवराव गोठोस्कर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी दीपक मुरकर, संजीव खानोलकर, सुनील रामचंद्रन, अजय पाटणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुष्टियोद्धा निखत जरीन आशियाई खेळांच्या शर्यतीतून बाहेर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दोन वेळा विश्वविजेत्या मुष्टियोद्धा निखत जरीन आणि नीतू घंघास यांचे २०२६ मध्ये होणाऱ्या कॉमनवेल्थ गेम्स आणि एशियन गेम्समध्ये खेळण्याचे स्वप्न भंगले आहे. या दोघी पटियाला येथे सुरू असलेल्या निवड चाचण्यांच्या उपांत्य फेरीत पराभूत होऊन बाहेर पडल्या आहेत.

२०२२ बर्मिंघम कॉमनवेल्थ गेम्सची सुवर्णपदक विजेती जरीनला ५१ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत साक्षी ४-१ ने हरवले. तर, ४८ किलो वजनी गटाची सध्याची विश्वविजेती मीनाक्षीने नीतूला हरवून अंतिम फेरीत स्थान मिळवले. २०२६ चे कॉमनवेल्थ गेम्स जुलै-ऑगस्टमध्ये ग्लासगो येथे होणार आहेत, त्यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपानमध्ये आशियाई खेळांचे आयोजन केले जाणार आहे.

# फुटबॉल विश्वचषकासाठी फ्रान्सचे नेतृत्व एमबाप्पेकडे

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२२ च्या फायनलिस्ट फ्रान्सने ११ जूनपासून सुरू होणाऱ्या फुटबॉल विश्वचषकासाठी २६ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. मागील अंतिम सामन्यात ३ गोल करणाऱ्या किलियन एम्बाप्पेला या संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे.

प्रशिक्षक डिडिएर डेसचॅम्प्सने एक मजबूत फॉरवर्ड लाइन तयार केली आहे. यात एम्बाप्पे व्यतिरिक्त, बॅलोन डीफ्फोर विजेता उस्मान डेम्बेले आणि युवा स्टार डेसिरे डौए यांसारखी नावे आहेत. २०१८ चा विजेता आणि २०२२ चा उपविजेता फ्रान्स यावेळी तिसरा विश्वचषक जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल. २०२२ मध्ये अंतिम सामना हरल्यानंतर एम्बाप्पे निराश होऊन मैदानावर बसले. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन त्यांना समजावण्यासाठी पोहोचले होते.

फ्रान्सचा फॉरवर्ड लाईनअप सध्या जगात सर्वात मजबूत दिसत आहे. संघात सुपरस्टार किलियन एम्बाप्पे यांच्यासोबत बॅलोन डीफ्फोर विजेता ओस्मान डेम्बेले, उदयनमुख तारे डेसिरे डौए, मायकल ओलिसे, रेयान चेर्की, ब्रॅडली बारकोला आणि मॅग्नेस अक्लिओचे यांचा समावेश आहे.

फ्रान्सची संपूर्ण टीम गोलकीपर: माइक मैगनन, ब्राइस सांबा, रॉबिन रिसर, बचावपटू: लुकास डिग्ने, मालो गुस्टो, लुकास हर्नांडेज, थियो हर्नांडेज, इब्राहिमा कोनाटे, जूल्स कौंडे, मॅक्सन्स लॅक्रोइक्स, विल्यम सलीबा, डेयोट उपामेकानो, एनगोलो कांटे, मनु कोने, एड्रियन रबियोट, ऑरेलियन टचौमेनी, वॉरेन जैरे-एमरी, मॅग्नेस अक्लिओचे, ब्रॅडली बारकोला, रेयान चेर्की, ओस्मान डेम्बेले, डेसिरे डौए, जीन-फिलिप माटेटा, किलियन एमबाप्पे, मायकल ओलिसे, मार्कस थुरम संघात असणार आहेत.

नागावच्या समर स्विमिंग कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद | विद्यार्थ्यांसह पालकांचाही उत्साह

# उन्हाळी सुट्टीत जलतरणाची पर्वणी

**। चौल । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये मुलांना काहीतरी वेगळे आणि आरोग्यदायी शिकण्याची संधी मिळावी या उद्देशाने पीएनपी सायरस पूनावाला स्कूल, नागाव येथे आयोजित करण्यात आलेल्या समर स्विमिंग कॅम्पला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. लहान मुलांपासून युवकांपर्यंत सर्व वयोगटातील सहभागींची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, कॅम्प परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



२ मे ते १ जून २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या कॅम्पमध्ये विशेषतः ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांचा मोठा सहभाग दिसून येत आहे. दररोज सकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत होणाऱ्या प्रशिक्षण सत्रांमध्ये अनुभवी प्रशिक्षक स्विमिंगचे मुख्य प्रशिक्षक अमर पाटील, दिनेश मानकर यांच्याकडून पोहण्याचे तंत्र, पाण्यातील सुरक्षितता, शारीरिक संतुलन आणि फिटनेस यांचे प्रशिक्षण दिले जात आहे.

आजच्या मोबाईल आणि स्क्रीनच्या युगात मुलांनी मैदानी व आरोग्यदायी उपक्रमांकडे वळावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. अनेक विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच स्विमिंग शिकण्यास सुरुवात केली असून, काही दिवसांतच त्यांच्या आत्मविश्वासात सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे प्रशिक्षक अमर पाटील यांनी सांगितले.

अत्याधुनिक स्विमिंग पूल, सुरक्षित वातावरण आणि माफक शुल्क यामुळे नागरिकांकडून या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.

> "या कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अनेक विद्यार्थी पहिल्यांदाच पाण्यात उतरले, मात्र आता त्यांच्यातील भीती कमी होत असून, आत्मविश्वास वाढताना दिसत आहे. पोहणे हा केवळ खेळ नसून, जीवनरक्षक कौशल्य आहे. त्यामुळे मुलांनी लहान वयातच जलतरण शिकणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
> – अमर पाटील, स्विमिंग प्रशिक्षक"

उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करत आरोग्य, शिस्त आणि आत्मविश्वास वाढविणारा हा स्विमिंग कॅम्प विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत असून, आगामी काळातही अशा उपक्रमांना अधिक प्राधान्य देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> "आजच्या मोबाईलच्या युगात मुलं घरातच जास्त वेळ घालवतात. अशावेळी अशा स्विमिंग कॅम्पमुळे मुलांना शारीरिक व्यायाम, आत्मविश्वास आणि शिस्त शिकायला मिळत आहे. माझ्या मुलीमध्ये काही दिवसांतच सकारात्मक बदल दिसून आला. प्रशिक्षकांकडून सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली जात असल्याने पालक म्हणून मलाही समाधान वाटत आहे. – मनिषा लोहार, पालक"

## मुन्ना इलेव्हन ठरला चषकाचा मानकरी

**चिपळूण :** सावर्डे येथील सह्याद्री शिक्षणसंस्थेच्या मैदानात रंगलेल्या शेखर निकम प्रतिष्ठान सावर्डे आयोजित आ. शेखर निकम चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेत मुन्ना देसाई इलेव्हन हातखंबा संघ विजेता ठरला. चिपळूणच्या अजिंक्य वॉरिअर्स संघाला उपविजेतेपद मिळाले. प्रकाशझोतात झालेली ही स्पर्धा चुरशीची झाली.

राज्यातील निमंत्रित १० नामवंत संघ सहभागी झाले होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्योजक सचिन पाकळे यांनी या स्पर्धेचे सुरेख नियोजन केले. विजेत्या मुन्ना देसाई संघास ५ लाख रुपये व चषक, उपविजेत्या अजिंक्य वॉरिअर्सला अडीच लाख रुपये व चषक देऊन गौरवण्यात आले.

स्पर्धेत सामनावीर म्हणून ओमी केणे (२६ धावा), मालिकावीर म्हणून अजिंक्य वॉरिअर्स चिपळूण संघाचा वासिक शेख या खेळाडूने (१५१ धावा- ६ बळी) घेत मालिकाविराचा मान पटकावला. उत्कृष्ट गोलंदाज समीर जगताप (अजिंक्य वॉरिअर्स, चिपळूण), मुन्ना देसाई इलेव्हन हातखंबा संघाच्या किरण पवार या खेळाडूने (१०३ धावा) उत्कृष्ट फलंदाज म्हणून मान मिळवला. या सर्व खेळाडूंना उद्योजक सचिन पाकळे, संजय पाकळे, कार्याध्यक्ष अनिरुद्ध निकम, कॅप्टन प्रकाश सावर्डेकर आदींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)